म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. ९७४४

# रेषा (काव्य संग्रह)

REFBK-0016306
REFBK-0016306


रेषा
राम शेवाळकर

# रेघा

[काव्यसंग्रह]

राम शेवाळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १६३०५
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे: स्थलप्रत
अनुक्रम ७९८८२ वि: काव्य
क्रमांक १८४४ नों. दि: १५८१८८

मूल्य रु. ४·००

REFBK-0016306
REFBK-0016306

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ती पहिली
जानेवारी १९६७

*

© राम शेवाळकर

*

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
" तपश्चर्या "
३८१ क, शनिवार पेठ : पुणे २

*

मुद्रक :
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०–३१ शनिवार पेठ : पुणे २

कुणालाही लळा लावणाऱ्या
मराठवाड्याच्या
वत्सलतेस—

कां जें लळेयाचे लळे सरति
मनोरथांचे मनौरे पुरति
जरि माहेरे श्रीसंत होति
तुम्हा ऐसि ॥ ९-३

—ज्ञानेश्वर

# प्रस्तावना

१९५७ सालच्या सरत्या जून महिन्यात अकल्पितपणे शेवाळकर नांदेडला आले व पीपल्स कॉलेजात प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्या वेळी आम्हा नांदेडकरांना शेवाळकरांची काहीही ओळख नव्हती. काही जणांचे व्यक्तिमत्त्व इतके दर्पयुक्त आणि प्रभावी असते की, त्यांना आपली ओळख नव्याने करूनच द्यावी लागत नाही. अशी माणसे फार काळ अनोळखी राहात नाहीत किंवा त्यांना स्वतःची ओळखही करून द्यावी लागत नाही. जणू त्यांचे वर्तन त्यांच्या अस्तित्वाची जाहिरात करीत असते. शेवाळकर स्वभावाने सौम्य आणि ऋजू, नोकरीच्या निमित्ताने ते नांदेडला आले त्या वेळी वयाच्या, ज्ञानाच्या व मानाच्या मानाने अगदीच लहान असणारा मी त्यांची चाचणी घेणाऱ्यांपैकी एक होतो. या पूर्वीच सुमारे वर्षभर आधी त्यांचा पहिला कविता-संग्रह 'असोशी' प्रकाशित झालेला होता. सर्व प्राध्यापक ज्याप्रमाणे अगदी गप्पपणे दबकत व अनोळखी असे एखाद्या महाविद्यालयात येतात तसे गप्पपणे शेवाळकरही आले. त्यांच्या काव्याची अगर वक्तृत्वाची ओळख आम्हांला कुणालाच नव्हती. आलेल्या कोणत्याही नव्या माणसाचे आम्ही व्याख्यान घेतो. तसे आम्ही त्यांचेही व्याख्यान घेतले. या पहिल्या व्याख्यानाचा अध्यक्षही मीच होतो. आणि पाहता पाहता सारे नांदेड या माणसाने अक्षरशः मोहवून टाकले.

थेंबाथेंबाने पाझरत सारे आसमंत ओले करून टाकण्याइतकी, निश्चितपणे जिंकणारी सौम्यता शेवाळकरांत आहे. नांदेडमधील कोणत्याही संस्थेचे सांस्कृतिक काम असो, की कोणत्याही सांस्कृतिक संस्थेचे कोणतेही काम असो शेवाळकर तिथे हटकून सापडू लागले. कुठलेही अधिवेशन असो, व्याख्यानांचे कार्यक्रम असोत किंवा वाङ्मयीन चर्चा असोत साऱ्याच सांस्कृतिक जीवनाचा ते अपरिहार्य घटक होऊन बसले. त्यांच्या आधी निर्माण झालेले लोकप्रियतेचे सर्व उच्चांक त्यांनी मोडून टाकले. शेवाळकरांची ही मोहिनी एकट्या नांदेडवरच होती असे नाही. साऱ्या मराठवाड्यावर त्यांनी अशीच जादू करून टाकली. सर्व मराठ-वाडाभर यापूर्वी कधीही मराठवाड्यातील अगर मराठवाड्याबाहेरील कोणाही

एका व्यक्तीची व्याख्याने अेवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेली नाहीत. गेल्या सहा-सात वर्षांत व्याख्यानांच्या निमित्ताने मराठवाड्याचे पाचही जिल्हे शेवाळकरांनी अक्षरशः पायाखाली आणले. गेल्या काही दिवसांत तर नांदेडकरांचे प्रतिनिधी म्हणून इतरांचे स्वागत व आभार मानणे हेही काम शेवाळकरांचेच झालेले होते. इतका हा माणूस नांदेडच्या जीवनात विरघळून गेलेला होता. परक्या ठिकाणी जाअून राहणे सोपे असते. नवख्या प्रदेशात तद्रूप होअून विरघळणे कठीण असते. तसे पाहिले तर खरे म्हणजे शेवाळकर विदर्भाचे. कोणे एके काळीं त्यांचे मूळ घराणे मराठवाड्याचे होते. मी मराठवाड्याचाच आहे असे शेवाळकर नेहमी म्हणत व ते मर्यादित अर्थाने खरेही आहे. पण त्यांचे सारे बालपण आणि शिक्षण विदर्भातच झाले. त्यांचे खरे घर विदर्भातच होते. त्यांच्या कर्तृत्वाला नवे धुमारे प्रथम विदर्भातच फुटले. आणि आज एका नव्या दिशेने वाटचाल करण्यासाठी ते पुन्हा तिथेच गेले आहेत. मराठवाडा हे त्यांचे घर नव्हते; ते त्यांचे एका अर्थी माहेर होते.

अलौकिक वक्तृत्वाची एक धुंद देणगी निसर्गानेच शेवाळकरांना दिली आहे. या देणगीच्या जोरावर साधू-संतांच्या या मायभूमीत भास–कालिदास–भवभूतीला शेवाळकरांनी पुन्हा एकदा जिवंत करून टाकले. आम्ही नांदेडकरांनी त्यांच्या वक्तृत्वाचे अनेक चमत्कार पाहिलेले आहेत. नाट्यसंमेलनांत, कंटाळवाणे खुले अधिवेशन संपल्यानंतर आणि पु. ल. देशपांडे यांच्यासारख्या रसाळ वक्त्याचा समारोप झाल्यानंतर थकलेल्या तीन चार हजार श्रोत्यांना केवळ आभार मानण्यापायी त्यांनी तासभर अक्षरशः जागच्या जागी खिळवून ठेवले. हे कौतुक पाहणाऱ्यांत आम्ही होतो. रसाळ, काव्यमय आणि बेहोश करणारे माधुर्ययुक्त मराठी गद्य त्यांच्या वाणीतून सतत पाझरत राहते. भास–भवभूतीच्या रस-ग्रहणाच्या कित्येक मधुर स्मृति मनात रेंगाळत ठेवून एक दिवस जसे अचानक शेवाळकर नांदेडला आले तसे अकल्पितपणे यंदा प्राचार्य म्हणून ते नांदेडहून वऱ्हाडात निघून गेले.

शेवाळकर हे वक्ते होते आणि आहेत; ही गोष्ट पूर्णपणे खरी नाही. कारण त्यांच्या वक्तृत्वाच्या मोहिनीचा उगम शैलीत, मांडणीच्या सफाअीत, विचारांच्या काटेकोर रेखीवपणात कधीच नव्हता. ते फर्डा वक्ते नव्हत. कोणत्याही विषयावर अस्खलितपणे बोलणे त्यांना जमणारे नाही. त्यांच्या वक्तृत्वाचा उगम व माधुर्य-

युक्त रसाळ पाल्हाळाचा उगम मनाच्या मोकळेपणात, गोष्टीवेल्हाळपणात आणि व्यक्तिमत्त्वाच्या अस्सल रसिकतेत आहे. मूळचा त्यांचा अभ्यास संस्कृतचा. संस्कृतचेच एम्. ए. ते प्रथम झाले. संस्कृत कवींच्या काव्य नाटकांच्यावर मूलतः त्यांच्या पिंडाचे पोषण झालेले आहे. भास, कालिदास आणि भवभूती यांचा आस्वाद धुंदपणे घेण्यात व या वाङ्मयातील सौंदर्यस्थळे आपल्या शैलीने मूर्तिमंत करून श्रोत्यांच्याकडून मनाने भोगविण्यात शेवाळकरांच्या रसवंतीला बहर येतो. मराठीकडे ते नंतर वळले. नागपूर विद्यापीठातील आपल्या वर्षीचे ते सुवर्ण पारितोषक विजेते, मराठीचे एम्. ए. आहेत हीही गोष्ट खरी. जुन्या मराठी वाङ्मयातील ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, मोरोपंत आणि नव्या मराठीतील गडकरी, बालकवी व नवकाव्यातील बहुतेक सर्व कवीही शेवाळकरांची प्रेमस्थाने आहेत. पण हा मराठीशी असणारा त्यांचा संबंध तुलनेने दूरचा आहे. विदर्भाच्या मूळच्याच उदार अतिथ्यशीलतेवर आर्जवी माधुर्य आणि भास-कालिदास-भवभूतींच्या काव्य सौंदर्याचे ठसे पचवीत आजचे शेवाळकर प्रामुख्याने साकार झाले आहेत. त्यामुळे शेवाळकरांचे घर हा गेली सहा-सात वर्षे नांदेडच्या सर्व कवींचा, वाङ्मय जिज्ञासूंचा एक कायम अड्डा बनल्यासारखे झाले होते. माणसे आकर्षित करून घेण्याची व मित्र जोडण्याची कला शेवाळकरांना चांगलीच साधली आहे.

मात्र शेवाळकर स्वतःच्या कवितेबद्दल फारसे उत्साही कधीच नव्हते. तसे ते नभोवाणीवरील कवी संमेलनांना सतत जात. त्यांच्या काव्यगायनाचे कार्यक्रमही लोकप्रिय होत. इतरांची काव्ये ऐकणे व आपली इतरांना ठसक्यात म्हणून दाखवणे हा त्यांचा आवडता छंद. पण आपल्या कवितांच्या प्रसिद्धीबाबत जबाबदारीची नीटशी जागीव शेवाळकरांना नव्हती. मराठीतील प्रथितयश मासिकांतून त्यांची कविता अधून मधून आली आहे; पण त्यात जाणीवपूर्वक सातत्य त्यांना कधी ठेवता आले नाही. जिल्हापत्रांच्या दिवाळी अंकातून ही कविता मागेल त्याला मागेल तशी ते देत बसले. १९५६ साली ‘ असोशी ’ प्रकाशित झाल्यावर व या संग्रहाचे काव्यरसिकांनी चांगलेच कौतुक केल्यानंतर दुसऱ्या संग्रहाला इतका उशीर होण्याचे काहीच कारण नव्हते. ( शेवाळकरांच्या पद्धतीने म्हटले तर आतासुद्धा ही घाभीच होते आहे ) त्यांची कविता एका संग्रहात संग्रहित करण्याची गरज त्यांची त्यांना वाटू लागण्यास अजून किती वर्षे लागली

असती कोण जाणे ! पण त्या आधीच त्यांच्या मित्रांनी हा सारा प्रयत्न व योग जुळवून आणला. ही मित्रमंडळी जर सततची हात धुऊन मागे न लागती तर शेवाळकरांच्या ' रेघा ' अजून किती दिवस ' हिर्मुसून ' बसल्या असत्या व अजून किती दिवस या कवितांना जन्मदात्यानेच ' कणवाचा गळला थेंब ' मिळू दिला नसता हे सांगता येणे कठीण आहे.

शेवाळकरांची कविता ही कोणत्याही अर्थाने युगप्रवर्तक नाही ही एक आनंदाची गोष्ट आहे. त्यामुळे या कवीपासून कोणते नवे युग निर्माण झाले, मराठी काव्याचे क्षितीज आणि त्याच्या कक्षा या कवीने कशा विस्तारल्या याबाबतची अवघड चर्चा या कवितेच्या संदर्भात करण्याची गरज नाही. त्यांची कविता ही कविता आहे की नाही इतके पाहिले म्हणजे चालू शकते. या संग्रहातील कवितांच्यावर एक ओझरती नजर जरी फिरवली तरी मी काय म्हणतो हे समजू शकेल. ही कविता एका विशिष्ट संप्रदायाची कविता नाही. कोणत्याही कवीच्या काव्यशक्तीला काही ठिकाणी मर्यादा पडलेल्या असतातच. हे घडणे अगदी स्वाभाविक आहे. पण अशा, कवीच्या काव्यशक्तीमुळे कवितेला मर्यादा पडणे ही एक निराळी बाब आहे. आणि एका संप्रदायाच्या एका पद्धतीच्या अभिनिवेशाने एखाद्या कवीने आपल्या काव्यातले आशय व अभिव्यक्ती ' एकारुन ' टाकणे ही बाब अगदी निराळी आहे. कारण मग त्या कवीची प्रयोगक्षमताही संपुष्टात येते आणि स्वतःच्या ठिकाणी दडून असलेल्या सुप्त सामर्थ्यांचा विविध अंगांनी शोध घेण्याची प्रक्रियाही संपून जाते. कोणत्याही एका संप्रदायाचा आग्रह न धरणारी भोवतालचे चांगले-वाईट जीवन रसिकतेने निरखून पाहण्यात धन्य होणारी व या रसिक आस्वादाचा आविष्कार करताना सफल-असफल होणारी अशी शेवाळकरांची कविता आहे. मात्र या कवितेचे प्रकृती सामर्थ्य प्रत्यक्ष कवीलाही नीट कळलेले असेलच याची खात्री देता येत नाही. काव्याच्या क्षेत्रातील एका महत्त्वाच्या चकव्याचे हे आरंभ स्थान आहे. कितीही झाले तरी कवी हा शेवटी माणूसच असतो. भोवताली घडणाऱ्या घटनांचे पडसाद त्याच्या मनात उमटतच राहतात. अशा घटनांचे प्रतिबिंब कवितेत उमटणारच. त्याला इलाज नाही. जीवन जगताना मध्येच एखाद्या क्षणी माणूस कृतज्ञतेने भारावून जातो. असे भारावून जा म्हणून नेहमीच त्याला कुणी सांगितलेले असत नाही. कधी कधी

असे सांगितल्यामुळेही कविता घडतात, नाही असे नाही. ' अग्निगीत '–' पाऊल-खुणा ' यांसारख्या कविता अशा असण्याचा संभव आहे पण यापेक्षा दुसराही प्रकार असण्याचा संभव जास्त आहे.

भारतावर चीनचे आक्रमण झाल्याबरोबर बहुतेक साऱ्याच भारतीय नागरिकांना तीव्र संताप आलाच असेल. सर्वांचीच चीड—धोरण म्हणून, सरकारी हुकूम म्हणून निर्माण झालेली नसते. कवी मंडळींतही हा संताप, ही चीड असेलच. उत्कटतेने जाणवणारी ही चीड आणि संताप यांचा प्रामाणिकपणा अमान्य करण्याची आवश्यकता नाही. पण भावनेचा प्रामाणिकपणा मान्य केला तरीही प्रामाणिक चीड काव्याच्या पातळीवर नेणे जमेलच असे नाही. वाङ्मयाच्या क्षेत्राला फार मोठा चकवा या ठिकाणी असतो. माणूस म्हणून जीवन जगताना जे सुख-दुःख, जी कृतज्ञता, जी चीड आणि वेदना आपण भोगतो, ज्यामुळे आपण भारले गेल्यासारखे होऊन जातो तेही कलात्मक व्यवहाराच्या पातळीवर आपल्याला उत्कटतेने जाणवलेले असेलच असे म्हणता येत नाही. चीनी आक्रमणावरची ज्यांची ज्यांची कविता काव्य म्हणून फसली, त्यांचे राष्ट्रावर खरेखुरे प्रेमच नव्हते, त्यांना चीनची खरीखुरी चीडच आलेली नव्हती हे म्हणणे सवंग टीकेच्या दृष्टीने सोपे असले तरी अप्रामाणिक व बेजबाबदारपणाचे आहे. हाच प्रकार टिळक जन्मशताब्दीच्या वेळेसही झाला होता. मराठी कवींच्या मनात टिळकांच्या विषयी आदर नव्हता, भक्तीने त्यांची अंतःकरणे चिंब झालेली नव्हती असे नाही आणि तरीही काव्याच्या पातळीवर हा अनुभव व्यक्त करणे फारसे कुणाला जमले नाही. वाङ्मयाच्या क्षेत्रातील मुख्य अडचण हीच आहे. कलात्मक अनुभवाच्या पातळीवर आपण केव्हा जातो हे कवीचे कवीलाही कळू शकत नाही. स्वतःच्या लौकिक जीवनातील उत्कटता व प्रामाणिकपणा यांवर भिस्त ठेवून त्यांच्याशी एकनिष्ठ राहण्याचा प्रयत्न करून प्रत्येक कवीला दर वेळी नवनवे प्रयोग करावे लागतात. ते कधी जमतात तर कधी फसतात. या प्रयोगातील यशापयश लक्षात घेणे व नवनवे प्रयोग करणे येथे कवीला खरी हिंमत दाखवावी लागते; कारण नवनव्या प्रयोगांत आपली कविता फसू देण्याचा धोका त्याला पत्करावा लागतो. असा धोका पत्करल्याशिवाय कोणत्याही कवीला आपल्या कवितेचा प्रकृतिधर्मच ओळखता येणे कठीण असते.

हा धोका पत्करता पत्करता कुठे तरी त्याच्या लौकिक गळ्याला नख लागते व मग पुढे गळ्यातून शारदेचे अलौकिक स्वर बाहेर पडू लागतात. या घसरगुंडीवर चढण्या-पडण्याच्या उद्योगाला शेवाळकरांची कविता पारखी नाही. म्हणूनच ' आपल्या अहंतेला सोबत घेऊन आपण ' पूज्य पावलांच्या खुणा ' हुडकीत गेलो तरीही तो ' पद्पथ ' सापडला नाही हे प्रामाणिकपणे त्यांना जाणवते. जर ही पूज्य पाउले आपल्या ' बधिर गात्रां 'ना ' दिव्यतेची यात्रा ' घडविणार असतील तर आपण त्यांचे ' नीरांजन ' होण्यास तयार आहोत अशी मनीषा ते बोलून दाखवितात. तुमच्या पाऊल खुणा पाहता पाहता ' समर्थ शब्दांना भोवळ येते ' व अद्याप ' तर्कमेरूचा कणा ' मोडून पडतो हेही ते जाणतात. या महामानवाच्या जयगीताच्यासाठी व्यास उभा राहिला तर त्याच्या पायातील ' बोबडा नूपुर ' होण्याची त्यांची तयारी आहे. वंदनीयांच्या विषयी असणारा हा भक्तिभाव व आदर खोटा नव्हे. पण हा आदर काव्याच्या पातळीवर नेणे ही गोष्ट कठीण होऊन बसते हेही खोटे नव्हे. या धडपडीतूनच ' वेड ' सारखी कविता निर्माण होते. आपण कवी आहोत. फुलाफुलांत, तरूलतांत आपण रमणारे आहो. मग हा नसता पागलपणा काय म्हणून यावा ? हे आपले क्षेत्र नव्हे मग इतका आनंद आपल्याला काय म्हणून वाटावा ? हे विचारता विचारताच शेवाळकर एक चांगली कविता लिहून जातात. संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न अस्तित्वात आले असेल; पण त्याची धन्यता मला काय म्हणून ? ते स्वतःलाच विचारतात निसर्गाच्या नित्य नव्या विलासात रमणारे व झुलणारे आपण एक कवी. फुले पाहावीत, मेघ पाहावेत. जलधारांच्या तारावर मेघमल्हार म्हणावा, उन्मादक चांदण्यात उन्मनस्क भ्रमावे ही आपली कक्षा. या वर्तुळाच्या परिघात एकभाषिक प्रांत झाले काय अगर न झाले काय या प्रश्नाला कोणतीच जागा नाही. मुंबई मिळाली अगर न मिळाली हा प्रश्न कुणीच विचारणार नाही. या आसमंतात हा प्रश्न विचारणाराच वेडा ठरेल. कळ्या उमलल्या की नाही, वायूलहरींचा हवा हवासा छळ वेलींना पटला की नाही, कळ्यांच्या मादक कैदेतून गंध मोकळे झाले की नाही या प्रश्नोत्तरांच्या आंदोलनावर हेलकावे खाणाऱ्या या माझ्या विश्वाला सात शतकांचे स्वप्न पूर्ण झाले की नाही, याचे पागलपण हवे तरी कशाला ? हे विचारता विचारताच धन्यता व आनंद सांगणारी एक कविता वहून गेली. कदाचित संयुक्त महाराष्ट्राचे गुणगान

करण्यासाठी शेवाळकर बसते तर ते फसलेहि असते. 'सख्या आता मी थकलो माझ्याकडून आता कविता होणे शक्य नाही' हे सांगतानाच तांबे मराठीला एक अमर कविता देऊन गेले. रसिकांच्या आग्रहाला बळी पडून एखादी कविता तांब्यांनी जुळविली असती तर मग ती जगलीच असती याची हमी कशी देता येणार ?

जे धन्यतेचे तेच वैतागाचे. ज्या जगात आपण माणूस म्हणून जगतो आहो ते जग खुपत असतेच. कारण खुपण्याजोगे या जगात पुष्कळ आहे. सारी ऋणानुबंधाची नाती कापून टाकून मेलेल्या मायेची खूण मनात दडपून ठेवावी असे वाटण्याजोगे प्रसंग जीवनात नेहमीच येतात. जीवनाच्या या व्यवहारात 'पहाटेच मला संध्याकाळ झाली' हा अनुभव अधून मधून सर्वांनाच येतो. अगदी खरे म्हणायचे तर तमाचा प्रामाणिक शेजार मला आहे, स्मिताची दिवलाणी विझली आहेत, पहाटेच संध्याकाळ झाली तरीही उजेडाची स्वप्ने मला बेजार करीत आहेत हे म्हणणेच काव्यसत्य आहे. कारण यात बाबींची उलटापालट झाली आहे. कवितेत अशी उलटापालट नेहमी होत असते. रघुनाथ पंडितांनी नलराजाच्या उपवनाचे वर्णन करताना अशीच उलटापालट केली आहे. या उपवनातील हे सरोवर सर्व ऋतूंत पाण्याने गच्च काठोकाठ भरलेले असते म्हणून बारा महिने येथे कमळे उगवतात व सभोवताली मंद सुवास दरवळतो असे रघुनाथ म्हणत नाही. तो साराच क्रम पालटून टाकतो. या तडागाच्या भोवती शीतलता निरंतर आहे व सुगंध आहे म्हणून सूर्यकिरणांचा उपसर्ग येथे पोचत नाही; म्हणून सर्व ऋतूंत तळे पाण्याने काठोकाठ भरलेले असते व बारा महिने कमळे असतात असे रघुनाथ म्हणतो. काव्यसत्य सांगण्याची प्रक्रिया तीच; फक्त प्रश्न वेगळे; इतकेच काय ते. ज्याला उजेडाची स्वप्ने बेजार करतात त्यालाच पहाटे सायंकाळ झाल्याचे जाणवत असते. त्याच माणसाला तमाचा शेजार प्रामाणिक वाटतो. ही वेदना, विफलता आणि कटुता अस्वभाविक नव्हे. ज्यांना मूल्यांची चाड आहे अशा माणसांना सदैव तिची जाणीव होत आली. पण धन्यता केवळ प्रामाणिक आहे म्हणून जशी काव्याच्या पातळीवर जात नाही तीच गोष्ट वैतागाची व विफलतेची आहे. एखाद्याच वेळी हा योग जुळतो.

शैशवाचे शव झाले। यौवनाचे वन
आयुष्यच आता दीर्घ। एक म्हातारपण ।।

या ओळी अशा वेळी जन्माला येतात. सर्वसामान्य म्हातारपणापेक्षा या आयुष्यव्यापी म्हातारपणाला वेगळे वैशिष्ट्य असते. आणि वेगळे व्यक्तित्वहि असते. त्याला ' अनंताची काठी ' असते. त्याच्या आसक्तीचा गुंता मोकळा करण्याची जबाबदारी पुन्हा अनंतावरच असते. नित्याच्या विफलतेला व कटुतेला वेगवेगळ्या ताणांच्यामुळे व आंदोलनांच्यामुळे एक अनोखेपणा निर्माण होतो. असे झाले तरच ती कविता. इतर वेळी आततायी अभंगाच्या शीर्षकासाठी आक्रस्ताळीं पद्ये वाचूनच थांबावे लागते. या आततायी मंडळीच्या मालिकेत मला सर्वांत यशस्वी वाटलेली कविता ' सराईत ' आहे.

वासनेच्या चित्रणाचेसुद्धा असेच प्रयोग शेवाळकरांनी केलेले आहेत. निदान वासनेच्या तीव्रतेची प्रामाणिक जाण सर्वांनाच असते; निदान असावी. समाजाची सुख-दुःखे आणि जाणिवा व्यक्त करणाऱ्या कविता कदाचित प्रामाणिक असतील; कदाचित याबाबत हुकूम असेल. अनुकरण, सामाजिक प्रतिष्ठा अशा धडपडीही असतील; पण वासना तर ज्याची त्याची स्वतःची असते. उत्कटतेने जागवलेली आणि भोगलेली, प्रीतीच्या पाशात गळ्यापर्यंत डुंबणाऱ्यांना तरी वासना नवखी नसते. पण शुद्ध स्वरूपात काव्याच्या पातळीवर देहाच्या लालसेचे वर्णन करणे नेहमीच जमेल असे नाही. या बाबतीत मराठी कवींत सर्वांत अधिक यश रेगे यांच्या कवितेला लाभले आहे; पण नेहमी मानण्यात येते तितकी रेग्यांच्या कवितेतील वासनाही नेहमीच शुद्ध स्वरूपात नसते. प्रकृतीच्या धाग्यात तिथेही संस्कृतीचे धागे अलगद येऊन मिसळतात. या दृष्टीने शेवाळकरांची ' सुकामार ' ही कविता पाहण्याजोगी आहे. सातवाहन हालाच्या गाथेत शुद्ध वासना काव्याच्या पातळीवर नेण्यास जमलेल्या व फसलेल्या गाथांची संख्या विपुल आहे. पण वासनेला प्रयत्न करूनही शेवाळकरांच्या कवितेत शुद्ध वासना म्हणून स्थान मिळू शकले नाही. ' सुळ्कन मारावी तुझ्यात सूर ' ही भावना खरी असेल; पण संस्कृतीचे कांही पदर तिला चिकटून येतातच. कारण हे सूर मारताना आपण जित आहोत की जेते आहोत ही भावना शिल्लक राहतेच. देहाच्या पातळीवर काव्य म्हणून वासनेचे चित्र

रेखाटणे चांगल्या कवीसाठी निश्चितच आवश्यक नाही. पण चांगल्या काव्याला हा प्रांत वर्ज्यही नाही. हे कार्य चांगले की वाओट हा नैतिक दृष्टीने विचारला जाणारा प्रश्न तर अगदीच्च निराळा. पण हे जमणारा भाग्यवंत फारच विरळा असतो. वासनेचे चित्रण शुद्ध वासना म्हणून करा असा कधीच आग्रह नाही. पण शुद्ध वासनेवरच लक्ष केंद्रित करणार असाल तर ती काव्याच्या पातळीवर नेणे तुम्हाला जमले पाहिजे हा आग्रह मात्र राहील. 'माझी तनु तुझी वेणु' असे जरी कवीने म्हटले तरी ही वेणु विविध-स्वरांनी सतत वाजवावी आणि 'मिठीत पाच विषयांना पूर यावा' ही किमया शेवाळकरांना जमणारी नाही. वासनेची दाहकता कितीही उत्कट व मोलाची असली तरी या कवितेत तिला साधन म्हणूनच स्थान आहे. 'सूर मस्तावले, दोन्ही देह गानमय झाले' आणि त्यांची मंद लय लागली तरी हा 'काम' स्वयंभू नाही. अिथे कामातच कामाची परिणती नाही. 'विस्तीर्ण भुअी गोविंद अन् क्षेत्र साळीचे राधा' ही घटना रेगे यांच्या कवितेत चिरतंद्रा आहे. ती युगानुयुगे शाश्वत राहणारी मनबाधा आहे. तसे शेवाळकरांचे होत नाही. त्यांचा 'काम' गर्भवेडा आहे. हे गर्भवेड एका नव्या संस्कृतीचा धागा घेअून येते आणि म्हणून 'परंधाम' होते. तुम्ही स्वतःची तनू प्रेयसीच्या ओठांत वेणू म्हणून द्या व सर्वस्वानिशी हरवून जा, की तिच्यात सुळ्कन सूर मारा आणि मी जिंकले अशी क्षणकाल धन्यता माना. दोन्ही अनुभवांची परिणती जर शेवटी कूस धन्य होण्यातच असेल तर मग हा गर्भवेडा काम एक साधन होअून जातो. वासनेचे साधन म्हणून चित्रण करण्यात गैर असे काहीच नाही. पण साध्य म्हणून चित्रण करण्याच्या प्रयत्नात ज्या वेळी साधन म्हणून चित्रण केले जाते त्या वेळी कवीच्या इच्छेचा लय आणि कवितेत व्यक्त झालेल्या अनुभवाचा लय हे विवादी स्वरांप्रमाणे एकमेकांना मंद करतात. कवितेत जन्माआधीच थोडा लिबलिबीतपणा झाक मारू लागतो. त्या मार्गाने प्रयोग करण्यात चूक काहीच नाही. पण हा आपल्या काव्यप्रकृतीला झेपणारा भाग नव्हे हे न ओळखण्यात मात्र भरपूर चूक आहे.

व्यक्ती–शेवाळकर हे एक प्रेमळ व सज्जन गृहस्थ आहेत; याची मला जाणीव आहे; पण कविता तपासताना हे अवांतर ज्ञान अप्रस्तुत व गैरलागू आहे. शेवाळकरांच्या कवितेत वासनेला केवळ विरंगुळा म्हणूनच स्थान आहे. ज्या

वेळी अहंतेचा फोड ठसठसू लागतो त्या वेळी वासनेच्या तेजाबात हा फोड विरघळवून टाकण्याचा प्रयत्न कवी करतो. सारे दिवे मालवून, त्या अंधाराचाच आडपडदा करून वासनांच्या गजांत कवी स्वतःला अडकवून घेतो. आपल्या प्रेयसीलासुद्धा आपले वाकलेले मन दिसू नये यासाठी अंधारात शिरणारा व अहंतेचा दुसरा भाग वासनेत जिरवू इच्छिणारा हा कवी कधी घराच्या भिंतीत कोंडला जाऊ शकत नाही. त्याच्यासाठी घट्ट मिठीची परिणती शेवटी नव्या सृजनात आहे आणि घट्ट मिठी ही फार तर विस्मृतीसाठी वेदनांच्या विळख्यातून हरवण्याच्यासाठी एक ठिकाण आहे. ज्या कवितेत मान्य केलेल्या पराभवावर पांघरूण घालणे इतकेच विलासाचे स्थान असते त्या कवितेत या पांघरुणाखाली जग विसरून कायम राहणे शक्य नसते. आकाश फिरून आल्यावर एक विसावा, जखमी होऊन परतल्यावर एक विस्मृति अगर निराश झाल्यानंतर नवीन आशा मिळण्यासाठी एक नवा घोट हे काही खऱ्या वासनेचे अगर खऱ्या प्रेमाचे चित्र नव्हे. या ठिकाणी वासनेबरोबर प्रीती हेही एक साधन होऊन जाते. किंबहुना अशा कवितेत प्रीती हेच वासनेला एक सुसंकृत नाव राहते. अिथे प्रेम हवे आहे; पण एकमेकांच्या सहवासात जग विसरण्यासाठी म्हणून नव्हे त्याची गरज सोबतीने नवी स्वप्ने पाहण्यासाठी आहे. ही स्वप्ने पाहताना आकाशात उड्डाण करण्याचे काम कवीचे आणि उंबरठा संभाळण्याचे काम प्रयसीचे हा प्रकार थोडा सनातनी भासण्यासारखाच आहे. पण त्याला आपला अगर कवीचा कुणाचाच इलाज नाही. हा उंबरठा मायाळू असला तरी आपला अिवलेसे घरटे संभाळणारा आहे. त्याच्या कक्षेत कोंडले जाण्याची कवीची तयारी नाही.

> घट्ट मिठीत प्रेमाच्या। नको करूं अधमुखे ।
> नको असे चिरडूस। माझे प्रकाशाचे पिसे ।।

हीच शेवटी कवीची भूमिका येते. आपण आकाशात फिरणारे आहोत, आपल्या हातात सूर्यदीप आहेत, आपल्या हातून या जगात काही तरी होणे आहे; असे जे आपण, त्यांना मधून मधून मायाळू उंबरठ्यावर विश्रांती घेण्याचा हक्क असावा. आपली अहंता या उंबरठ्याच्या आत वितळविता यावी. गांधारीच्या उपेक्षेने उत्तेजित झालेल्या तप्त अंधारात बेहोश चढा गांधार

बुमविता यावा हे कवीचे मागणे आहे. गरज वाटेल त्या वेळीं पुन्हा हा उंबरठा ओलांडून प्रकाशाचा पाठलाग करण्याचा मोकळा परवाना असावा अशी ही भूमिका आहे. स्वतःला कोंडून टाकणारा, पायात बेडी होऊन अडकणारा हा सारा मायालोभ आणि मायेचा पाऊस आहे. हे उंबरठ्याचे स्वरूप कवीने मान्य केले तरी त्याच्या सावलीत याच्या अंतरंगातील नवा आशाळू अंकुर संकोचतो याची काय वाट? विचार करण्याची, अनुभव घेण्याची ही या कवितेची पद्धत आहे. शेवाळकरांच्या कवितेत प्रेम, वासना आणि संसार आहे. प्रणयाची धुंदी आणि पुत्रप्राप्तीचा आनंद आहे. पण या साऱ्यांना जीवनाचे सर्वस्व मानून त्यात गुंगण्याची त्यांची तयारी नाही. दिवसभर मुशाफिरी करणाऱ्या मुशाफिराची सायंकालीन विश्रांतीची धर्मशाळा इतकेच या बाबीचे स्थान. या साऱ्या विवेचनाचा थोडक्यात अर्थ असा की, आधुनिक प्रतिमांच्या भाषेत जरी शेवाळकर बोलत असले तरी शेवटी त्यांचा मनःपिंड भास-कालिदासाच्या काळात वावरणारा आहे. कवी म्हणून काव्याच्या गुणवत्तेला याची काहीच बाधा येणार नाही. वाङ्मयीन मूल्यमापनात अनुभव कवितेच्या पातळींवर गेला की नाही हाच खरा प्रश्न; व एकमेव प्रश्न आहे असेच मला वाटते. पण वाङ्मय समजून घेताना जो अनुभव काव्याच्या पातळींवर जाण्यासाठी झटत आहे. त्यात सफल-विफल होत आहे त्याचा प्रकार कोणता, त्याचे स्वरूप काय हेही समजावून घेतले पाहिजे. अनुभव घेण्याची आपली ही प्रकृती शेवाळकर मान्य करतील काय? बहुधा ते करणार नाहीत. कारण एक एक गोष्ट जर कवी कबूल करू लागले तर मग कवींना निरंकुश कोण म्हणेल? आणि मग कदाचित पटपट मान्यता देणारे लोक कवी तरी कसे राहतील?

शेवाळकरांच्या कवितेत निसर्गसौंदर्याला फार मोठे स्थान आहे. आपली काव्याची भूमिकाच या पद्धतीने त्यांनी सांगितलेली आहे. मध्येच प्रतिभाशक्ति दडून बसते आणि मग तिची शोधाशोध सुरू होते. जिच्या सहवासात सारी मौज, जिच्यासाठी सारे जीवन तीच जर अशी दडली तर हा प्राणाशीच खेळ सुरू झाला असे म्हटले पाहिजे. ही शोधाशोध कवी नेहमीच्याच ठिकाणी करतो. आपल्या प्रतिभेच्या दडण्याची नेहमीची ठिकाणे म्हणून जी शेवाळकरांनी सांगितली आहेत ती त्यांचे भटकेपण, त्यांची रसिकता आणि त्यांचे निसर्गवेड सांगणारी आहेत. 'लोळणारे ऊन', 'पाने व्हावीत बेभान असे वारियाचे

मुक्त गान', 'कळ्या पाकळ्यांच्या गंध वेणा', 'सावल्यांच्या बोलावल्या सांज खुणा', 'काळोखातील लाख भर्जरी गुपितें', 'दगडाला लावण्याची फुले आणणारी लाख चांदण्याची गीते', 'वाऱ्याची मूक लाजरी झुळुक' आणि 'शुक्राची दीप्त साजूक वासना' ही प्रतिभेची दडून बसण्याची नेहमीची ठिकाणे. अजून एका कवितेत वेगळ्या पद्धतीने हेच सांगितलेले आहे. प्रयसीच्या काळ्या केसातले उषेचे फूल हुंगून कवी भ्रमंतीस बाहेर पडतो. सांगातीण म्हणून त्याला प्रेयसी लागत नाही. लोळणारे सुस्त ऊन तो घेऊन जातो. तरण्या तृणांशी खेळून पाखरांच्या पिसांमध्ये लीलया लपून जातो. दुपारच्या वेळी कवीला तेजोधारांत न्हाणारा श्यामसुंदर माधव दिसतो. सायंकाळी मेघपुंज रंगारंगांचा तराणा गातात. हे सारे पाहून थकलेल्या पंखांनी कवी परत येतो व तिच्या कुशीत येऊन तो सांगतो सारी उःशापाची रात्र तिचीच आहे. वह्या तपासतानासुद्धा खिडकीजवळ एक हिरवी फांदी डुलते आहे. तिच्यावर एक पाखरू दवबिंदूप्रमाणे झुलते आहे याची जाणीव कवीला असतेच. निसर्गाच्या या दृश्या-दृश्यांतून, कणा-कणांतून आपण प्रेरणा घेतो आणि त्यांत मस्त राहून आपली कविता निर्माण होते. असा शेवाळकरांचा अधिक खरे म्हणजे त्यांच्यातील कवीचा दावा आहे. हा दावा नवा नाही. याही पूर्वी अनेकांनी तो केलेला आहे. कोणी निसर्गातून सारा नीतिबोध मिळवला आहे. कुणाला तिथे आदर्श स्वातंत्र्य सापडले आहे. कुणाला भावनेची मुक्तता आणि आदर्शाची परिपूर्णता निसर्गात गवसली आहे. झरा जे गातो ते खरे गान. ते सौंदर्य आपल्या गीतात नाही असे बालकवींचे म्हणणे आहे. भृंग जे गुंजन करतो ते खरे गाणे असे केशवसुत म्हणतात. शेवाळकर असे कशासाठी म्हणून निसर्गाकडे जात नाहीत. सौंदर्याची परिपूर्णता निसर्गात आहे, आपण त्याचे अनुकरण करतो असाहि त्यांचा आग्रह नाही. कशासाठी म्हणून नव्हे; पण निसर्गाच्या सहवासात रमणे, त्याच्याशी तादात्म्य पावणे हा त्यांचा छंद आहे. इथून आपल्या कवितेला प्रेरणा मिळते असे त्यांचे म्हणणे आहे.

पण खरोखरी असे कधी असू शकेल काय? सौंदर्याच्या देवतेपासून प्रेरणेचा आशीर्वाद घेऊन कवीला काळ्यावर पांढरे करता येईल काय? इथेच

एक हेत्वाभास दडलेला आहे. या कवीला उन्हातून कधी प्रेरणाच मिळत नाही. कारण उन्हाकडे ऊन म्हणून पाहण्याची याला सवयच नाही. तो त्याकडे सुस्त-लोळणारा एक पदार्थ म्हणून पाहतो. हे सुस्त लोळणे उन्हाचे नाही हे याने उन्हावर लादलेले आहे. तुफान वारा येतो आणि पाने सळसळतात. त्या वेळी पाने बेभान होऊन गाणी म्हणत आहेत हे 'असणे' नसून याचे पाहणे आहे. सकाळच्या वेळी कळ्या-पाकळ्यांना सुगंधाच्या प्रसूति-वेदना सुरू झालेल्या याला दिसतात. सकाळ असो, दुपार असो, अगर सायंकाळ असो; याला तिथे कांहीतरी जाणवतच असते. आकाश ढगाळलेले असले तर याला वाटते ते ओठ मिटून दुःख दाबीत आहे. एखादाच मेघ वाऱ्यावर वाहात असला तर याला निरुद्देश तरंगणे दिसते. आकाश निरभ्र असले तर हा म्हणतो तेजोधारांत श्यामसुंदर माधव न्हात आहे. उजाड, ओबडधोबड माळ असला तरी त्याच्या पोटातले झरे याला दिसतात. कारण कुठे काय पाहायचे हे हा ठरवीत असतो. सर्व बाह्य जगतावर स्वतःच्या भावनांचे आरोपन करीत हा आपल्याच अनुभवांना बाहेर प्रक्षेपित करीत असतो. याचा खरा अर्थ हा की, या कवितेत निसर्गाला खरोखरी स्वयंभू स्थान नाही. कवीच्या मनातील अनुभवांचे निवेदन सफल व्हावे म्हणून प्रतिभा होण्यापुरते निसर्गाचे स्थान आहे. ही हकीकत एकट्या शेवाळकरांची नाही. बालकवींच्यापासून पाडगावकरांच्या पर्यंत सर्वांची आहे. खरोखरी निसर्ग-सौंदर्यात केवळ निसर्ग-सौंदर्य म्हणून, रंगात रंग म्हणून रमणे व त्याची अभिव्यक्ती करणे कवीला शक्य आहे काय? हा माझ्यासमोर एक मोठाच प्रश्न आहे. चित्रकलेच्या क्षेत्रात ज्यांनी हा प्रयोग केला त्यातून Fovism चा एक पंथ निर्माण झाला. रंग हे माध्यम असणाऱ्या कलेतसुद्धा Fovism स्थिर होऊ शकला नाही. या संप्रदायाचे चित्रकार क्रमाने अभिव्यक्तिवाद आत्मसात करीत गेले किंवा कारागिर झाले. पण काव्याच्या क्षेत्रात असा संप्रदाय-निर्माण होणे शक्य आहे काय? आणि जर हे शक्य नसेल तर काव्य-सौंदर्याचा उगम निसर्गातील पानाफुलांत पाहण्यात अर्थ तरी काय? खरे म्हणजे ज्या वेळी कवी मी निसर्गात प्रतिभा हुडकण्याचा प्रयत्न करीत आहे असे म्हणत असतो त्या वेळी बाहेर पाहण्याचे निमित्त करून तो पुन्हा एकदा स्वतःच्या अंतरंगातच पाहात असतो. बाहेरची साधने घेऊन आपल्या भावनांचे त्यांवर आरोपण करून स्वतःच आपल्यात दडलेल्या स्वतःचा शोध कवि घेत असतो.

किती दिवसांपासून । माझा मीच हरपलो ।
शोधशोधले परंतु । नाही पुन्हा गवसलो ॥

हाच त्याच्या शोधाशोधीचा मुख्य धागा आहे. सप्तस्वरांच्या गुंतागुंती उकलीत तो तोंडाने जरी स्वरांच्या सौंदर्यात न्हायिल्याचे सांगत असला तरी स्वतःलाच हुडकीत असतो. या प्रवासात कधी त्याला आपण सापडल्याचा भास होतो आणि कधी आपण हरपल्याची विषण्ण जाणीव होते. निसर्गदृश्ये रेखाटतानाही यापेक्षा वेगळे असे काही चाललेले नसते. सारे कवी, चांगले कवी असतील तर आपल्याच आत पाहात असतात. आत पाहणारे आणि बाहेर पाहणारे अशी वर्गवारी आपण करतो ती स्वतःची सोय म्हणून. पंडित कवींना बाहेर पाहणारे म्हटले म्हणजे काही वाटत नाही. पण फुलराणी, निर्झर, संध्यारजनी, अरुण लिहिणाऱ्या बालकवींना बाहेर पाहणारे म्हटले म्हणजे चुकल्या चुकल्यासारखे वाटते याचे कारण हेच असावे.

या दृष्टीने शेवाळकरांच्या कवितेतील कांही चित्रे पाहण्याजोगी आहेत. 'चाहूल', 'नभ भरून आले', 'वादळ', 'उत्तर रात्र', 'खिन्नता', 'दुपार' ही अशी कांही चित्रे आहेत. यांपैकी एका चित्राला तर कवीनेच 'पहाट' चित्र म्हटले आहे. माझ्या मते शेवाळकरांची ही एक अतिशय रमणीय कविता आहे. चिवचिवणारी चिमण चेहऱ्याची पहाट, ओठ मिटून भावनेचा कढ दाबणारे ढगाळ आकाश, हलुवार हातांनी दूर सारलेल्या पांघरूणासारखा वारा, गढीच्या मूक भिंती, कंदिलाचे थकलेले स्मित या साऱ्या चित्रात आता कमी काय राहिलेले आहे? कवी म्हणतो 'माझे प्रिये! जरा बाहेर ये. हे पहाटचित्र पाहात पाहात आपण स्तब्ध उभे राहू; म्हणजे चित्र पूर्ण होईल. जणू या चित्रात आभाळ, पहाट, कंदील, गढीची भिंत आणि वारा या वस्तू पुरेशा नाहीत. तू आणि मी या दोन वस्तू मिळविल्याखेरीज चित्र पूर्ण होणार नाही. पण खरी गोष्ट अशी आहे की, या दोन वस्तू नसल्याने चित्र अपूर्ण होत नाही; त्या असल्याने चित्र पूर्ण होत नाही. चिमण चेहऱ्याची चिवचिवणारी पहाट ही पुन्हा कवीच्याच मनाचा एक तुकडा आहे. आपल्याच व्यक्तिमत्त्वाचे हे घटक भोवतालच्या वस्तूंत पेरून ठेवल्यामुळे त्या वस्तूसकट स्वतःचा समग्र अनुभव घेणे भाग आहे. त्याशिवाय हे चित्र पुरे होणार नाही. शेवाळ-

करांच्या या कवितेत चित्रित झालेली ही पहाट आपल्या परिचित पहाटेपेक्षा फार निराळी आहे. नवे वारे वाहू लागतात. गजबज सुरुवात होते. पक्षी किलबिल घेऊन येतात. फुले लगबगीने उमलू लागतात अशी थकवा विसरून उठणारी आणि जागे होताच गजबजणारा उल्हास घेऊन येणारी प्रसन्न पहाट आपल्या ओळखीची आहे. पण दुःखाने ओथंबलेली, मलूल आणि निष्पाप पहाट ही थोडी नवीनच आहे. पण जरी ती पहाट नवी असली तरी तिचा खरेपणा जाणवतो; कारण पहाट प्रसन्नही नसते, उदासही नसते. प्रसन्न अगर उदास असतो अनुभव घेणारा कवी. या अनुभवाचा खरेपणा उदास पहाटेला खरी करून टाकतो.

शेवाळकरांची कविता आता पूर्ण वयात आलेली आहे. नवनवे प्रयोग हाताळून पाहण्याची या कवितेची धडपड आजही चालू आहे. आणि याहि-पुढे चालू राहील. या धडपडीतील यशापयश अधून मधून लक्षात घ्यावेच लागेल. पण आता ती ऐन तारुण्यात आली आहे. 'असोशी' वाचताना जो कोवळेपणा जाणवतो तो 'रेघा' वाचताना जाणवत नाही. नित्याच्याच घटनांच्याकडे सहजगत्या वेगळिकीने पाहणे ही लीला आता त्यांना सुलभ झाली आहे. शिशिर ऋतूत झाडांची पाने जमिनीवर ओघळून पडतात हे दृश्य जुनेच आहे. पण त्यात वैतागाने शृंगार उतरून ठेवणारी खंडिता पाहणे नवीन आहे. झाडा-वरून गळणाऱ्या प्रत्येक पानात सहवास सोडवत नाही हा आशाळू लंपटपणा पाहणे व पानांचा निरुपाय जाणणे नवीन आहे. रमणी आपल्या प्रियकरावर आसक्त असेल; पण म्हणून तिच्या आभूषणांनी तिच्यावर आसक्त राहू नये की काय ? निरुपायाने गळून पडलेल्या वाळलेल्या पाचोळ्यात कवीचे आसक्त मन खिळून राहणे पुन्हा नवीन आहे. कवितेत शेवटी विषय नवीन नसतात. त्यांना निमित्त करून व्यक्त होणारा भावानुभवच नवीन असतो. आता शेवाळकरांच्या लेखणीतून—

दिवस फूल मिटवून जेधवा
मी वाऱ्याचा श्वास रोधतो
उगी थबल्या तरुराजीतून
गूढ मूकता ढाळीत बसतो !

यांसारख्या ओळी सहजच पाझरू लागलेल्या आहेत. श्रावण धारा मुक्तपणे पिऊन धीट झालेला ओला श्रावणवारा अेकीकडे आणि गात्र न् गात्र पेंगळून टाकणारी भाद्रपदातील उत्तर रात्र दुसरीकडे यांतली लय पकडणारा व साऱ्यांना लाख जाग्या डोळ्यांनी न्याहाळणारा अनुभव व तो व्यक्त करण्याची रीत आता कोवळीं राहिलेली नाही. अशा या त्यांच्या ऐन भरातील कवितेत मनाच्या तारा छेडणाऱ्या तितक्याच रमणीय भावमंथर बाबी विखुरलेल्या आहेत. निसर्गातून माणसाकडे, माणसातून निसर्गाकडे अशी आंदोलने घेता घेता दोन ध्रुवांना एकत्र करून आता शेवाळकरांची कविता या अेकीकृत चित्रावर नव्या सौंदर्याने निथळत चवऱ्या ढाळीत उभी आहे. वेडा गर्भकाम, गर्भधारणा झाल्याबरोबर विझून जातो. आता एक नवा अंकूर आपल्या उदरात जपणारी ही प्रेयसी स्पर्शातून विझलेली वीज पेटवणारी आणि येताक्षणी ओळखीच्या लोचनांची नवखी धिटाअी दाखवणारी राहिलेली नाही.

> व्यर्थ माझी बेगुमानी । व्यर्थ माजोरी अहंता ।
> खाक झाली जी तुवा । अर्ध्या कटाक्षे पाहता ॥

ही धुंदी आता संपलेली आहे. अेक तृप्त मौन गुबगुबीत आणि लोभस रूप धारण करून आता शांत बसले आहे, आणि बाजूला तितकाच गुबगुबीत व लोभस असा काळ्या मातीच्या ओंजळींतला आम्रवृक्षाचा निश्चल गुच्छ आहे. डेरेदार, निश्चल, मोहराने सुगंधित झालेला संस्कृत कवींचा हा लाडका वृक्ष आपल्या निश्चलतेतहि नवी बीजे निर्माण करीत आहे. दूध भरल्या हाका मिटून गेल्यानंतर आणि सोनेरी स्मिते विझून गेल्यानंतर जे शिल्लक राहिले आहे ते हे आहे. पण जे उरले आहे ते व्यर्थ नव्हे, तीच जे विझून गेले आहे त्याची सार्थकता म्हटली पाहिजे. अशी कविता लिहिता लिहिता जुन्या संकेताचा नवा वापर सहजच होअून जातो. चिरतारुण्याचे प्रतीक असणारी आम्रमंजिरी आता गर्भवतीचे रूप घेअून येते आणि कालिदासाचा भाग्यवान दृढ सहकार वृक्ष सगळाच्या सगळा एका संदर्भात कठोरगर्भ शकुंतला होतो. आणि तरीही यातील कांहीच खुपत नाही. जणू या संकेताचा हा वापर आपण अपेक्षीतच होतो. कवितेत येताच जणू तो चटकन आपण पटवून घेतो. अशी कविता लिहितानाच भाग्याची खाण मोकळी

झाली आहे. म्हणजे कवितेच्या रेघा आभाळातील परमार्थाला खांब होतात. इतर घट्ट आशयाच्या व रमणीय कविता लिहितानाच रेघा लांबलांब वाढाव्या अगर अशी कविता लिहिण्याच्या प्रयत्नात अपयशी होऊन रेघा संकोचत जाव्या; त्यांनी अेवढेसे टिंब होऊन थांबावे. कवीच्या हाती याहून अधिक कांही नसते. आणि रसिकांच्या अपेक्षासुद्धा अपेक्षा निराळ्या नसतात.

शेवाळकरांच्या नवनवे सौंदर्य दाखविणाऱ्या लोभस आणि सौंदर्यमयी कवितेला असला रुक्ष व विश्लेषक प्रस्ताव लिहिण्याची कांहीच गरज नव्हती. अशा प्रास्ताविकांनी काव्यातील सौंदर्य उलगडून दाखविण्याचा आव आणण्यात अर्थ नसतो. कारण कविता ही पाऱ्यासारखी अेक चंचल वस्तू आहे. ती कवीला चटकन सापडत नाही तशी कवितेच्या चिमटीतही चपखल मावत नाही. धूमकेतूप्रमाणे अचानक एक नवा धुमारा सौंदर्याने निथळत प्रकट होतो आणि कवीच्या प्रकृतीविषयी बांधलेले सारे अंदाज कोलमडून टाकतो. पण ज्यांनी हा संग्रह प्रकाशित करण्यास उत्साह दाखविला ते प्रस्तावनेविना संग्रहाला राहू देण्यास तयार नव्हते. म्हणून हा उद्योग करणे भाग पडले. कवितेच्या रसरशीत संग्रहाला तशीच सौंदर्यास्वादाने ओथंबलेली प्रस्तावना लिहिणे मला शक्य नव्हते. असा योग जुळला म्हणजे, प्रस्तावना कुमारिकांच्या केतकी भालप्रदेशावर सौभाग्याचा टिळा लावल्यासारखी शोभून दिसते. आमच्या सारख्यांची प्रस्तावना अनावरण करण्यासाठी सिद्ध केलेल्या पुतळ्यावरील अवगुंठनासारखी असते. प्रस्तावनेचा हा बुरखा अनावरणापुरता तत्कालिक असतो. पुतळ्याचे सौंदर्य हा आडपडदा बाजूला सारून ज्याने त्याने आपल्या इच्छेनुसार पाहावयाचे असते. आतला पुतळा पाहावा ही जिज्ञासा जागी करीपर्यंत या पडद्याचे प्रयोजन असते; त्यानंतर अशा अवगुंठनाची गरज संपते.

१५ डिसेंबर १९६६
नांदेड

—नरहर कुरुंदकर

'असोशी' या माझ्या पहिल्या संग्रहानंतरच्या या काही कविता. या कविता वेळोवेळी विविध नियतकालिकांतून आलेल्या आहेत. या ठिकाणी त्या एकत्रित आहेत इतकेच. 'असोशी'-तीलहि कांही कविता यांत संग्रहित केल्या आहेत.

गेल्या कांही वर्षांपासून माझ्या मित्रांचा नव्या संग्रहाबद्दलचा आग्रह चाललेला होता. शेवटी व्हीनस प्रकाशनचे चालक यांनी हा संग्रह प्रकाशित करण्याचे ठरविले व आता हा काव्यसंग्रह प्रकाशित होत आहे. याबद्दल श्री. स. कृ. पाध्ये व व्हीनस प्रकाशन यांचा मी ऋणी आहे.

ज्या रसिक मित्रांच्या आग्रहावर व उत्तेजनावर हा सारा प्रपंच घडला त्यांचे ऋण मी कसे काय मानणार? कुरुंदकर, महाजन, चंदू— या मित्रांचे सौहार्द पाहिले की माझी कृतज्ञता संकोचाने आपले ओठच मिटून घेते. निरुपाय!

वणी
गीताजयंती, १८८८

राम शेवाळकर

# अनुक्रम

रेघा १, येथे २, गुच्छ ३, विरामचिन्ह ४, व्यथा ५, उःशाप ६–७, खूण ८–९, म्हणतो ना १०, आहे जाणीव ११–१२, कृतज्ञता १३–१५, नागमोड १६, चाहूल १७–१८, अटळ १९, निरांजन २०, छंद २१, ओढ २२, वेत २३, नभ भरून आले २४, वादळ २५–२६, उत्तर रात्र २७, हळू हळू २८, गुंगारा २९–३०, खिन्नता ३१–३२, तळमळ ३३–३४, काही दिवसांपुरते ३५–३६, आता ३७, शोध ३८–३९, मानभाव ४०–४१, एकला चलो ४२–४३, आस ४४–४५, उपायन ४६–४७, कबूल ४८,

मृत्यु जयंती ४९–५०, नादार ५१, अलीकडे ५२, सराअीत ५३–५४, नेता ५५, व्यवहार ५६, थट्टा ५७–५९, उत्तर ६०, दुःस्वास ६१, हेतू ६२, लाभ ६३–६४, परंधाम ६५, पाहुणा ६६, मुका मार ६७, इन्द्रधनू ६८, वेड ६९–७०, उपकार ७१, पाऊल खुणा ७२–७३, अग्निगीत ७४, दान ७५–७६, डोळे ७७–७८, निष्ठा ७९–८०, दुपार ८१, कुळाचार ८२–८३, स्वयेंगोदावरी आली ८४, बदल ८५–८६, पाप ८७, पहाटचित्र ८८.

## शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ६७ | १ | अुमें | अुगे |
| ७१ | ८ | भ्रालिंगावया ! | आलिंगावया ! |
| ७१ | ११ | ठुमरी | ठुमरीने |
| ७१ | ११ | तुझ्याने | तुझ्या |

## रेघा

काळ्या काळ्या रेघा
वाढतां वाढल्या लांब लांब
आभाळांतिल परमार्थाच्या
आधाराला झाल्या खांब.

लांब रेघा हिर्मुसुन
झाल्या एवढेसे टिंब
आभाळांतिल व्यर्थासाठीं
कणवाचा गळला थेंब.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ४१८८२ वि: काव्य
क्रमांक १७४४ नों. दि: २६।९।६७

## येथे

अडखळेल येथे पाउल जातां येतां
उमलेल अंतरीं सुगंध आठवणींचा...
हसविली कितिकदां मनीं जुईची कळी
कितिकदां दंवानें भिजवियलीं पाकळी
उरिं गोड शहारें उडतां प्रेम तुषार
अन् मूकपणातहि कंपित व्हावी तार !
ते क्षणैक रुसवे ( आतां हांसविणारे )
ते रागलोभ दो ओठीं थरथरणारे
कोरडे हुंदके—तेंहि आठवते ना
अजुनहि मधूनच ये दाटुन वेदना !
या स्थळीं शिंपिले सडे कुणीं मायेचे
मानसीं फुलविले लाख मळे वाळ्याचे
पण शुष्क जलाशयीं कमल शोधणे व्यर्थ
हे उरेल केवळ स्मृतिचें पावनतीर्थ !

अडखळेल येथे पाउल जातां येतां
अन् खोल यातना करतिल व्याकुळ चित्तां !

## गुच्छ

मिटून गेल्या
जरी तुझ्या दुधभरल्या हांका
विझून गेलीं
आणि सदाचीं स्मितें उन्हेरीं...
——— पाहिलास कां ?
काळ्या मातीच्या हातांतील
गुच्छ आम्रवृक्षाचा निश्चल
    आत्तांच्या तव
    गुबगुबीत मौनापरि लोभस
    आणि गरोदर !

## विराम चिन्ह

सांवळी डोहाळवती धरा
शींवपळसाच्या विळख्यांत
सैल.
आम्रतरुचा गुपचुप झुबका
निर्विकार !
तुझ्या
मृद्‌गर्भ हिरव्या कवितेंतलें
गोंडस विरामचिन्ह.

## व्यथा

माझें अिवळें घरटे
तुझ्या कवेंत आकाश
माझा मायाळू अुंबरा
तुझे क्षितीज हताश.

तुझ्या हातीं सूर्यदीप
माझ्या घरीं मंदवात
थिट्या नभीं व्याकूळ तूं
घरट्यांत मी निश्चिन्त.

आज मन आकाशलें
प्रकाशलें कोटीं रवि
माझ्या उंबऱ्याला आतां
तुझें क्षितीज आडवी.

माझ्या विकासीं–प्रकाशीं
दरवळे तुझी कथा
तुला कधी कळेल...ही
माझ्या आनंदाची व्यथा !

## उःशाप

तुझ्या काळ्या केसांतलें
फूल उषेचें हुंगून
जातो फिराया, सांगातीं
सुस्त लोळणारें उन्ह.

पानें, फुलें, कळ्या आणि
तरूण्या तृणांशीं खेळून
पांखरांच्या पिसांमध्यें
जातो लीलया लपून.

दुपारच्या आभाळाचें
अहो केवढें वैभव !
तेजोधारांत नाहतो
श्यामसुंदर माधव !

पश्चिमेचें सांजसुख
मिळे कलत्या किरणां
जेव्हां मेघपुंज गाती
रंगारंगाचा तराणा.

माझ्या गतिवेड्या मना
मुक्त आकाशाचे वेध
जिथे नाहींत रोखण्या
मऊ आर्जवाचे बंध.

श्रांत पंख पहुडती
तुझ्या विश्रब्ध कुशींत
जाणिवेंतून गळतें
व्योमयात्रिकाची कात.

दिसभर मी सोसतों
शाप क्रूर गतीचे हे
उःशापाची रात्र सारी
तुझ्या मालकीची आहे.

## खूण

सारी कापून काढावीं
नातीं ऋणानुबंधाचीं
मनीं खोचून ठेवावी
खूण मेलेल्या मायेची !

ओरबाडून फाडावें
खोट्या भावनेचें दुःख
पुढे उरावें केवळ
माझें माझ्याशींच सख्य.

विश्वासांत आजवर
मनें किती कालवलीं...
उन्हें सरल्यावरही
चाचपडली सावली !

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४१८८२ वि: काव्य
क्रमांक १०७४ नों. दि. १६।१।६८

खोल ओसाड डोळ्यांत
व्यर्थ क्षणांची दखल
झुकलेल्या पाठीवर
पराभवाची पखाल !

मान मुरडून फिरे
तान कुरळी घशांत
झालें आयुष्य उरलें
आता एक अधू गीत !

## म्हणतो ना...

तो दिवा मालवून टाक
म्हणतों ना मी मालवून टाक ?
तुझ्या जयिष्णु दृष्टीला
दिसूं नये माझा वांक
ती खिडकी लावून घे
म्हणतों ना मी लावून घे ?
तुझ्या वासनांचे गज
आतां माझ्या आगेंमागें......
तो पडदाहि खालीं सोड
म्हणतों ना मी खाली सोड ?
तुझ्या तेजाबांत निवो
माझ्या अहंतेचा फोड !

## आहे जाणिव

आहे जाणिव
वह्या कधीच्या तपासायच्या पडल्या आहेत !
आहे जाणिव
अक्षरांमधे चुका कोंवळ्या दडल्या आहेत !
आहे जाणिव
खिडकीपाशी हिरवी फांदी डुलते आहे !
एक पांखरूं
दंवबिंदूपरि मजेंत तीवर झुलते आहे !
आहे जाणिव
कशाने तरी चित्त लाखे जळतें आहे !
पुन्हा पुन्हा अन्
नजर पिशापरि क्षितिजापुढती पळते आहे !
असतें जाणिव
सारें तोडून दूर कुठे तरी जाणें आहे !
असते आशा
कांहीं तरी मग हातुन आपुल्या होणें आहे !

तरीहि जेव्हां
        दिसून येते : आकांक्षाहि अडल्या आहेत
उरते जाणिव–
        वह्या कधीच्या तपासायच्या पडल्या आहेत !

## कृतज्ञता

जेव्हां सत्तेचें लग्न लागलें
आंधळ्या बेहृदय काळाशीं;
आम्ही बेगुमान अक्षता फेकल्या
व्यक्तित्वाच्या : पोटसीमित देहलोभी सुखाच्या
— राहून उपाशी
( तुम्हाला हे माहीत आहे
तुमच्याच निःसंज्ञ अस्तित्वाच्या बोहल्यावर
तो सोहळा झाला आहे ! )
आम्ही बेगुमान अक्षता फेकल्या.
आणि ओरडलों :
सा – व – धा – न !
तेव्हांपासून
त्यांच्या संसाराच्या अन्नावर
आमचा संन्यास नांदू लागला......
उन्हानें विस्तवाकडे पाहून हंसावें
तसे अुन्हून तुम्ही म्हणाला :
ती तुमची चूक होती.

हाय !-कसें भरवूं तुम्हाला ?
तुम्हीहि ती चूक करावी
हीच आमची भूक होती !
तुमच्या आंखांच्या चुकचुकण्यानें
नियतीला अुपास घडले असते
कारण ती चूक भुकेली होती.
तरीच—
आमच्या अंधाराच्या चुका
पहांटेने माफ केल्या
आणि उजेडाच्या भुका
तृप्तही अमाप झाल्या !
तरी असे ओशाळूं नका
कावरे बावरे होअूं नका
आपलें नातें जुनें आहे !

सत्तेचें काळाशीं घरठावानें झालें
त्याहिपेक्षां दुणें आहे
आपलें नातें जुनें आहे !
        आम्ही दुसरे कोण होतों ?
आम्हीं दुसरे होतो कोण ?
तुमच्या आकांक्षांचे अंकुर
तुमच्या तंद्रींतील जागृति
तुमच्या वेड्या गाण्याचे स्वर.
क्षोभ तुम्ही, अम्हि स्फोट जाहलों
तुम्ही हात, तर अम्ही अक्षता
तुम्ही कंठ अन् अम्ही गर्जना
म्हणून ‘ सावध ’ गेली सत्ता !
        खरेंच ! अपुलें जुनेंच नातें
        जरी विसरलो तुम्हांस...( भोंगळ ! )
        क्षमा कशी मागावी ?
        झालोंः
        तुमच्या शुभ हातांची ओंजळ ! !

## नागमोड

आल्यापुन केलें । दु:खानें सांगाती
चालविले दातीं । धरुनीया
पहांटेंच मला । संध्याकाळ झाली
स्मिताची विझली । दिवलाणी
उजेडाची स्वप्नें । करिती बेजार
तमाचा शेजार । प्रामाणिक
भाळीच्या ओळींत । किती जोडाक्षरें
वाचितां मातेरें । हिमतीचें
आजवर दिला । अश्रूंनी आधार
त्यांनीच अपार । बळ द्यावें
चोखाळीन हीच । नागमोडी वाट
आपुलें ललाट । तुडवीत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ................ दि: ................
क्रमांक ........................ नों दि ................

## चाहूल

किती वैतागाने तुवां
होता झाडिला शिणगार
निरुपायानें गळालें
पान पान भुईवर.

  किती दिवस पाहिली
  तुला तशीच विरक्त
  मन राहिलें खिळून
  वाळलेल्या पाचोळ्यांत.

कुणासाठी अेवढ्यांत
झाली होतीस अपर्णा
कशासाठी सारें व्रत
आणि निष्ठूर साधना ?

  आत्ता कुठे पळसाने
  तुझें फोडलें गुपित
  आजवर लपवलेलें
  हंसू फुटे डहाळींत.

तेव्हां विरक्तीची ओढ
आता नटायाची घाई
आंब्यावर अुमटली
तुझी न्यारी नवलाअी

आतां बाकी ओळखलें
कशापाअीं ही धांदल :
तुला आहे ना लागली
ऋतुराजाची चाहुल ?

## अटळ

मोहर आला होता...
तो
केव्हांच गळाला
सुगंध सुटला होता
आता
तोहि जळाला
अभिवचनें तर
होति मिळालीं
पिकावयाचीं...
टळणारी पण नव्हती
दैना
भुक्या वयाची ! !

## निरांजन

माझ्या अहंतेला
घेऊन सोबत
तुझा पदपथ
शोधू गेलों.

पूज्य पावलांची
नोळखिली खूण
मातीस वंदून
परतलों.

बधिर गात्रांना
देऊन गा मात्रा
घडवावी यात्रा
दिव्यतेची.

अंध अहंतेला
भक्तीनें जाळून
तुझें निरांजन
होईन मी !

छंद..........

शोधियलें विश्वांत तुला
अणुरेणूच्या अंतरातही
सापडलों मग मीच मला !
बघुन पहाटें रंगविलेलें
प्राचीवर माझेंच मनोगत
चराचराच्या अधरांमधुनी
ओघळते मम सोनेरी स्मित !

दिवस फूल मिटवून जेधवा
मी वाऱ्याचा श्वास रोधतों
ऊगिच थबकल्या तरुराजींतुन
गूढ सूकता ढाळीत बसतों !
शोधायाचा छंद मला
अणुरेणूच्या अंतरांत... मी
सापडण्याची भीति तुला !!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६३०६

## ओढ

सुळकन् मारावी
तुझ्यांत सूर……
माझ्या देहांतील पांचहि भुतांना
ओढ आततायी
तुझ्या
स्वागतप्रिय जघनसुखद ‘ अंत ’ रंगाची !
तूं—पण सराईत सुलभा
पांच जणांना पांचालीसम
देशूं करशील बुदबुद—सुरळी
अेकच.
अधरमधुर वलय मुलायम
अेखादेच.
—पुरें झाली
तुला जिंकल्याची
तेवढीहि खूण !—

## बेत

नको शब्दता मौनास मध्यरात्रीच्या गहन
नको शिळेस यायला आर्त स्वरांचें स्फुरण
बरीं मुकाटलीं झाडें गूढ लोभस गुंगींत
नाही वाहत्या वाऱ्याची जरा बोचरी संगत

दूर धूसरता निळे वस्त्र बैसली विणीत
कुठें असंगपणाचे रंग अबोल भरीत
अशा अेकांतापरीस मूक अेकलें अुरावें
ओठ होअून वाऱ्याचे पानांवरून फिरावें......

—हळू शालीन शांतीचें मुख जाहलें अुजळ
तुझ्या मनापरी माझी चळे सावली निश्चळ
रित्या अंतरीं कुणीसें देत जांभअी हंसलें
आणि चांदण्याचे भोळ्या बेत भाबडे फसले !

## नभ भरून आलें

नभ भरून आलें, अन्
सृष्टीचें पुलकित मन
ओथंबुन आले ढग
उत्सुक झाले मृत्कण

स्तब्ध स्तब्ध वृक्ष उभे
रिक्त उभारून हात
ओघळत्या भाग्यास्तव
तृणहृदयें उत्कंठित

आतुरलें माझें मन
आतुरलें आसमंत......
—नभ भरून आलें तरि
तूं अजून घरकुलांत !

## वादळ

असें पाहतां पाहतां
गेले नभ झांकोळून
आणि अचानक आली
मला तुझी आठवण
आली तुझी आठवण
उसवला दोरा दोरा
तप्त धुळीला कवेंत
घेत उधळला वारा
मत्त वादळ वाऱ्यानें
माझा उस्कटे निवारा
एका मुक्त क्षणासाठीं
जीव झाला सैरावैरा......
तेव्हां वादळलें होतें
माझें मन, तुझी काया
धुरोळ्यानें कुस्करली
आभाळाची धुंद माया

आणि पाहतां पाहतां
नभ गेलें झांकोळून
तुझ्या– माझ्या अस्तित्वांची
होय बेहोष गुंफण !

आज वादळ वाऱ्यानें
झाली त्याची आठवण
पुन्हा तशा क्षणासाठीं
वादळलें तन मन !

## उत्तर रात्र

भाद्रपदांतिल अुत्तर रात्र
मुक्त पिअून श्रावणधारा
धीट झालेला ओला वारा
पेंगळून टाकी गात्र न् गात्र
भाद्रपदांतील अुत्तर रात्र.

तलम अंधार पांघरलेलीं
घरें, दारें मिटून गेलीं
पुसून गेले संज्ञा चित्र
भाद्रपदांतील अुत्तर रात्र.

झाडें झुडें स्तब्ध कशीं
गूढ स्वप्नांत मग्न जशीं.
लाख डोळ्यांनी जागी मात्र
भाद्रपदांतिल अुत्तर रात्र.

## हळूहळू...

हळूहळू सांजवेळेंत येतात
माझिया अपुऱ्या स्वप्नांचे रंग
अणूंत रेणूंत झुरतो माझाच
पहिला कोंवळा भावनाभंग.

निळ्या शांततेंत शिरते कांपत
हुर्हूर रोजची कारणांवाचून
क्षितिजाच्या मनीं चालतें माझिया
पहिल्या भेटीचें सांवळें चिंतन.

पेंगुळती डोळे अुजेडाचे; तेव्हां
मनांत जागते तम; आठवून :
कसा विश्वासलों कोंवळेंपणांत
घेअुनीया तुझे मुकेलें वचन !

## गुंगारा

चालतों चालतों
कलत्या पहरीं
वेगळ्या वाटेनें
चालतां चालतां
खुळेपणाची
संवय ग्यालेल्या
शुंभ चरणांना
देऊन गुंगारा.
मनासवें वर
उडुनहि जातों...
आभाळाच्या भाळीं
धुळीच्या कणांचा
लावाया अंगारा.
व्योमाच्या अंगीचें
ढगांचे कुष्ट
क्षश्विनी हातांनी
पुसून काढाया.

सरत्या अुन्हाची
पिवळी हळद
मनाला माखाया.
क्षितीजावरती
मेघ पुंजक्यांची
रांगोळी पाहाया.
येणाऱ्या सांजेची
कोवळी पावलें
ओठांनी चुंबाया.
रात्रीच्या अबोल
मायाळू कुशींत
मिटून डोळे
मिटून वाचा
हळूच शिराया
शिरून सराया
मनासवें वर
अुडूनहि जातों
चालतों चालतों
वेगळ्या वाटेने...

## खिन्नता

मघाशींच संपलेली
मध्यरात्रीची संगत
अंग मोडून झोपला
आत्ता असाच निवांत.

मूक मिटून पापण्या
सारीं घरेंहि झोपलीं
रस्त्यावरून नशेंत
सुस्त घटका चालली.

तेव्हां पाहुण्या झुळुका
आल्या तशा परतल्या
चांदण्यांच्या मांडीवर
घेती विसावा सांवल्या.

घेई गारवा आसरा
पोक्त रात्रीच्या कुशीचा
संथ डोळा जड झाला
मरगळल्या आशांचा.

व्यर्थ घेण्यांत अंदाज
वेळ सारा जाय रिता
मौनामागे लपलेली
जागी अजून खिन्नता—!

## तळमळ

घट्ट मिठींत प्रेमाच्या
नको करूं आचमुसें
नको असें चिरडूंस
माझें प्रकाशाचे पिसें !

कुरवाळणें दृष्टीचें
आता जाळतसे जीवा
आलिंगनांत जाणवे
युगायुगाचा दुरावा !

मान्य ! सारा मायेमुळे
तुझा पडतो पाऊस,
पण ढगाळ हिवांत
भयें थरारतें पीस !

आणि क्षमस्व ! जराशी
दाट झांवळी आवर
सांवलींत संकोचतो
नवा आशाळू अंकुर !

म्हणुनीच अुमलेना
पालवींतलीहि कळी
जळीं असोन मासोळी
म्हणुनीच तळमळी ! !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ४१८८२ दि: का। व्य
९७४४ १६।५।८

## कांही दिवसांपुरतें

नेमियेल्या भेटीगांठी
आतां व्हाव्यात विरळ
जरा अेकलेपणांत
जावी जिरून भुरळ.

आतावरी खूप झालें
डोळे वाहणें, पूसणें
आणि सर्वेच मनांत
समाधानानें हासणें !

किती जोडावे जिव्हाळे
डोळ्यांमधल्या पाण्यानें
किती मोडावें मनास
गोड फसवेपणाने ?

कांही दिवसांपुरतें
असें अलिप्त असावें
टोंक होऊन शिंदीचें
सारे दुरून पहावें !

लोटलेल्या काळासवें
मग सरेल दिमाख
अुमलेल विरक्तींत
पुन्हा नवीन ओळख !

## आतां

स्मरतें : तेव्हां कितीदा तरी
येतांक्षणींच
विरघळायचें नेत्रीं गीत
भिजायचीं ओठांतच नातीं
पेटायची अन्
स्पर्शांतुन विझलेली वीज !

आणिक आतां...किती दिसांनीं
आल्यावरही
ओठांमधलें विझलें गीत.
डोळ्यांमाजीं भिजलीं नातीं
निरुपायाच्या
स्पर्शानें विरघळली वीज ! !

## शोध

किती दिवसांपासून
माझा मीच हरपलों
शोधशोधलें परंतु
नाहीं मुळीं गवसलों
होती आस : सांपडेन
कुठें तान्हेल्या तंद्रींत
कुठें सातही स्वरांची
गुंतागुंत अुकलीत.
अुपचाराच्या कोषांत
किंवा गळलों असेन
वर अुथळपणाचें
दीन हंसू पांघरून.
असे सारखें धुंडिलें
मींच हरपल्या मला
ठिसूळ या वागण्यांत
नाहीं सुगावा लागला !

कधी येईल कळेना
असा आसवांचा दीस
जेव्हा मीलनीं माझ्याच
मन निवेल खुषींत !

## मानभाव

हें मला माहीत होतें
कीं पुन्हा येशील तूंही
ओळखीच्या लोचनांची
पाहण्या नवखी धिटाभी.

दाविण्या : ना सोसलेल्या
वेदनांची तीव्र लाही
अन् जुन्या चुकलेपणाच्या
' मान्य 'त्ची चिंब घाभी.

मानभावी मान्यता ही
आंतली तैसीच भीति
मानभावी वेदना अन्
आसवांची धारही ती !

हें मला माहीत झालें
जेधवां आलीस येथें
मानभावी लोचनांनी
मागण्या मागील नातें !

हें जरी माहीत होतें
व्यर्थलें सारें तरीहि...
मानभावी मान माझा
गळला कधीं, कळलेंहि नाही !

अेकला चलो—

अेकलाच चालत जा
अेकलाच चालत जा
दिशाहीन यात्रेच्या
या अनंत वाटेवर
येत हांक क्षितिजाची
फसवी तरि दुर्निवार
काळाला तुडवित जा
अेकलाच चालत जा
अडवितील पर्वत तुज
आणि वाहत्या सरिता
घालतील भूल वनें
थांबु नको त्याकरितां
तूं तुझेंच अैकत जा
अेकलाच चालत जा
येअील वादळ तुफान
स्थिरचर हरवेल भान
आलें जरिं अंधारुन

रे धुळिच्या लोळांतुन
ओळ तुझी आंखत जा
अकलाच चालत जा
अकाकी शून्य वाट
वळणांचा रानघाट
गगनांतुन आश्वासन
घेत जा खुशाल ताठ
सोबती तुला न दुजा
अकलाच चालत जा
झाक करें दीप तुझा
आणि पुढे सार वात
ज्योतीला जप सदैव
वादळांत पावसांत
अुजळ तिने मार्ग तुझा
अकलाच चालत जा !
अकलाच चालत जा ! !

## आस

किती थोर ऐश्वर्य आओी, तुझें हें
शशी – सूर्य यांची पदीं पैंजणें
घालूं तुला कोणती माळ कंठीं
खुलावी तुझी दिव्यशोभा जिनें ?

तुझीं अन्नधान्यें, तशी संपदाही
मला स्वेच्छया तूं कधी अर्पिशी
काढून घेशी दिलेले कधी तूं
देणें न देणें तुझी गे खुषी.

असे काय कैसे तूला मी वहावे,
ओशाळतो जेथ माझेपणा
द्रव्यें तुझी तूज अर्पूनिया का
होते कधी पूर्ण अभ्यर्चना ?

ठावें तुला, एवढी फक्त आहे
माझी स्वताची कमाअी अशी—
ज्याचा अहंकार माझ्या मनाला
ऐसें व्यथारत्न बावनकशी !

देतो तुला दीर्घ जोपासलेलें
तेजोमुखी दुःख माझें गडे
मोलें तयाच्या मला त्वत्कृपेची
छाया मिळो, भाग्य हें केवढें !

( कविवर्य रवींद्रनाथ टागोर ह्यांच्या कवितेवरून )

## अुपायन

होअील सांज, जाअील
रे, पूजनवेळ टळून,
कर लगबग, घेअी कृपेने
हें अिवलें फूल खुडून....

अुमललें तुझ्यास्तव, बघतें
स्पर्शाची तुझिया वाट
ओघळेल, अवमानाने
होअून खिन्न, मातींत.

मान्य ! या न मुळी सुरंग
वा मोहविणारा गंध
परि जीव तुलाच वाहावा
हा त्यास कवीचा छंद.

तूं स्वयं आपुल्या हातें
कुर्वाळून त्यास खुडावें
त्या करस्पर्शहर्षाने
अन् कृतार्थ त्याने व्हावें...

कंठांत विभूषण होणें
ही नसे तयाला आस
तव हस्तें देठ तुटावा
हा एक भाबडा ध्यास !

होशील सांज, जाशील
रे, पूजनवेळ टळून,
कर लगबग, घेशी कृपेने
हें अिवलें फूल खुडून...

( कविवर्य रवींद्रनाथ टागोर ह्यांच्या कवितेवरून )

## कबूल

खूप शरद नांदलों सुखांत अभयतां : कबूल !
अश्रु-हास्य गुंफण्यांत भान विसरलों : कबूल !
पाहिले वसंत, अुग्र ग्रीष्म साहिले : कबूल !
कृष्णमेघ झेललेत श्रावणांतले : कबूल !
चांदण्यांत हिंडण्यांत धुंद जाहलों : कबूल !
धारांनी कोसळत्या चिंब नाहलों : कबूल !
प्रीतिने परस्परांस लाविला लळा : कबूल !
दर्शनेंच प्राणांच्या लोपल्या कळा : कबूल !

काळ झिंगण्यांत कसा विर्घळला हे न कळे
आज मनीं घोंघावत स्वप्नांचें स्मरण शिळें
धन्यवाद त्या क्षणांस– तुजसाठी जे सरलें
धन्यवाद हे तुलाहि... धन्य मी तुझ्यामुळे.

दे निरोप अश्रु हसून, आलें हें माझे स्थल
ओसरल्या कैफाची शपथ ! जाअुं दे— कबूल ?

## मृत्युजयंती

क्षुद्र अहंतेने केला
माझ्या व्यक्तित्वाचा खून
कागदी नाण्यांच्या–पार्यी
अर्धमेला स्वाभिमान.

सुखस्वास्थ्याच्या वाटेनें
गेला आकांक्षांचा प्राण
अराजकाच्या व्याधीनें
मेलें निष्ठेचेंहि श्वान !

आपुलीं मरणें
पाहतों मी डोळां
तो दुःख डोहाळा
अश्रुपम !

आपुल्याच भोगापायीं
व्हावी नियती गर्भार
अगा नवल ! जन्माला—
आलें मृत्यूंचें लेंढार !

## कबूल

खूप शरद नांदलों सुखांत अभयतां : कबूल !
अश्रु-हास्य गुंफण्यांत भान विसरलों : कबूल !
पाहिले वसंत, उग्र ग्रीष्म साहिले : कबूल !
कृष्णमेघ झेललेत श्रावणांतले : कबूल !
चांदण्यांत हिंडण्यांत धुंद जाहलों : कबूल !
धारांनी कोसळत्या चिंब नाहलों : कबूल !
प्रीतिने परस्परांस लाविला लळा : कबूल !
दर्शनेंच प्राणांच्या लोपल्या कळा : कबूल !

काळ झिंगण्यांत कसा विर्घळला हे न कळे
आज मनीं घोंघावत स्वप्नांचें स्मरण शिळें
धन्यवाद त्या क्षणांस– तुजसाठी जे सरलें
धन्यवाद हे तुलाहि... धन्य मी तुझ्यामुळे.

दे निरोप मञु हसून, आलें हें माझे स्थळ
ओसरल्या कैफाची शपथ ! जाउं दे— कबूल ?

## मृत्युजयंती

क्षुद्र अहंतेने केला
माझ्या व्यक्तित्वाचा खून
कागदी नाण्यांच्या-पायीं
अर्धमेला स्वाभिमान.

सुखस्वास्थ्याच्या वाटेनें
गेला आकांक्षांचा प्राण
अराजकाच्या व्याधीनें
मेलें निष्ठेचेंहि श्वान !

आपुलीं मरणें
पाहतों मी डोळां
तो दुःख डोहाळा
अश्रुपम !

आपुल्याच भोगापायीं
व्हावी नियती गर्भार
अगा नवल ! जन्माला—
आलें मृत्यूंचें लेंढार !

मरणांचे जन्मोत्सव
वेदनांनी वाजवले
देह भोगून जाहले
धन्य मरण सोहाळे !

देवाला दयेचा
केवढा हा सोस
नित्य नवा दीस
मरणाचा !

## नादार

शैशवाचें शव झालें
यौवनाचे वन
आयुष्यच आता दीर्घ
एक म्हातारपण.

अशा म्हाताऱ्याची कांठी
झालेल्या अनंता,
कसा काढणार बाबा
याच्या आसक्तीचा गुंता ?

तुझ्या कृपेच्या पेढीचा
कुठवरचा हवाला
किती दिसांचा हिशेब
याचा चुकणें राहिला ?

गेल्या अनेक जन्मांचा
राजरोस हा नादार
तुझ्या लौकिकासाठीच
याला मुकाट्याने तार !

१६३०६

## अलीकडे—

‘ बोले तैसा चाले
त्याची वंदावी पाउलें ’
तुवां सांगीतलें तुक्या
आणि आम्हींहि मानिले.

आम्ही बोलून चालून
गड्या, सामान्य माणसें
बोला सारखे चालणें
आम्हां जमायचे कसें ?

पण खरें सांगूं तुला ?
अलीकडे काय झाले—
पाउलें पांगूळल्यानें
वंदण्याचे कष्ट गेले ! !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना

## सराईत

केली चुकवाचुकव
बतावणी, लपालप
तरी मागें मागें आलें
माझें अेकनिष्ठ पाप.

माझे पाप आपोआप
तारुण्याने ऋणी केले
मायेमुळे कायेचे ह्या
लगोलग धनी झालें.

गांधारीच्या अुपेक्षेने
अुत्तेजित हो अंधार
तप्त अंधारीं घुमतो
चढा बेहोष गांधार.

क्षुब्ध ओढाळ अेकांत
पतितपावन होकार
दोन तापल्या चुकांत
वितळतो अविचार.

डोळे बांधली गांधारी
आणि जन्मांध विलास
यांच्या पोटीं अटळच
शत प्रमादांची रास !

असें सराअीत पाप
माझ्या मागें मागें आलें
नवा पुण्याचा देव्हारा
सारा विटाळून गेलें ! !

## नेता

जे कां रंजले गांजलें
त्यांसी म्हणे न आपुले।
तोचि नेता ओळखावा
देश तेथेचि जाणांवा ॥

ज्यासीं आपंगिता नाहीं
त्यासीं करी जो विदेही।
मृदु सबाह्य नवनीत
तेथे सज्ज याचे चित्त. ॥

दशा करि जें कुत्र्याशी
तैसी दासा आणि दासी।
अरे बाबा, सांगूं किती
तोचि धनवंताची मूर्ति ॥

## व्यवहार

आपुलिया बळें, नाहीं लिहवत
दाता धनवंत, आज्ञा त्याची ॥
साळुंकीसारखा, बोलतसें वाणी
अैकणारा धनी, नित्याचाच ॥
किती म्या पामरें, डोलावे अुत्तरें
केले विश्वंभरें, धन्य कान ॥
शब्द अर्थ त्याचें, माझे फक्त तोंड
जोंवरी अखंड, अर्थप्राप्ती. ॥
मन, बुद्धि, आत्मा आणि माझे हात
चाले हातोहात विक्री त्यांची ॥
कुणाचीहि थैली, पामराचें पोट
निभावा निघोट व्यवहार ॥
जगू दे देणारा, नये मरुं दास :
केला अट्टाहास, याजसाठीं ॥

## थट्टा

कुठें दडलीं होतीस ग
अितके दिवस – अितका वेळ ?
किती कठोर मांडलास
माझ्या प्राणांशीच खेळ.
किती हुडकावें जिवानें
अुगा रुष्ट झालेलीला
शोध शोधून शिणून गेलों
झालों कितीदां रडवेला.
सारीं धुंडून पाहिलीं
तुझीं नेहमीची ठिकाणें :
लोळणारें अून्ह, तृणांतरीचे स्पंदन
पानें व्हावींत बेभान, असें
वारियाचें मुक्त गान,
वय आतुर कळ्यांचें, पाकळ्यांच्या गंधवेणा
सावल्यांच्या भावल्यांना बोलावत्या सांजखुणा,

काळोखाच्या मनांतलीं लाख भर्जरी गुपितें,
दगडाला लावण्याची फुलें आणणारी अशीं
दिव्य चांदण्यांचीं गीतें,
मध्यरात्रींच्या झाडांची झोप चाळवली तरी
कूस मागणारी एक
मूक लाजरी झुळूक;
मुक्तकेशा पहांटेची आळवून आराधना
तृप्त होणारी शुक्राची दीप्त साजूक वासना
सारे करून सवरून ' कुठे काय 'चे बहाणे
फिक्या धुक्यांत लपणें
आणि दंवातील न्हाणें...
—सारी धुंडून पाहिलीं
तुझीं नेहमीचीं ठिकाणें !

कोण किती साहणार
असें अडेल दडणें ?
कंटाळल्या प्रतीक्षेचें
पुरें थकलें श्रमणें !

शोध संपल्यावरती
माझ्या मरगळल्या मना
अचानक प्रकटून
कशी आणली चेतना ?

पुरे झाली थट्टा तुझी
आतां नको होऊं रुष्ट
माझ्यामध्येच लपून
मला शोधण्याचें कष्ट !

## अुत्तर

असें बोलून गेलीस
जेणें पाणी डोळां आलें
आणि अुत्तर देतांना
पंचप्राण गोळा झाले !

पंचप्राणांचे अुत्तर
तुझ्या प्रश्नानें जन्मलें
तुवां डोळां आणलेल्या
अून पाण्यांत नाहलें.

आतां हसूं तरी नको
रूप पाहून बावळें
तुझ्या वाणीला त्याचेच
होते लागलें डोहाळे.

माझे अपंग अुत्तर
तुझ्या डोळ्यांत रुतलें
आणि त्यांतल्या धारांनीं
पंचप्राण सुखी झालें !

## दुःस्वास

कां रे तुझ्या आठवणींचा
असा सदाचा दुस्वास ?
जेवतांनाच नेमाने
फिरें तोंडातून घांस !

अुष्टीं खरकटीं करून
जरा पडावें आडवें—
तशा अर्धझोंपेंतही
तुला मज न सोडवें

कधी कातरवेळेला
ह्यांच्या समोर हसावें...
परि तुझ्या स्मृतींसाठीं
मन वाहत असावें.

अशा तुझ्या आठवणींनी
किती पाहावा रे अंत ?
तरी बरें—सोबतीला
वृद्ध सांवळा एकांत !

## हेतु

रागावुन गेलीस परंतु
अनुरागापरि प्रियच तुला मी
तोडायचे ठरविलेस जरि
तुलाच छळतील तुझ्याच अूर्मि.

कृष्णरात्र झालीस जरी तूं
मनीं तुझ्या फुलवीन चांदणें
निःशब्दांतहि ऐकवीन तुज
माझें आत्ताचें हें हसणें !

असेल जर विसरून जायचे :
विसर गडे हा खुळा अबोला
विसरशील नेमका नाहीतर
विसरायाचा निश्चय अपुला !

रागावुन गेलीस तरीहि
अनुरागाहुन प्रियच मला तूं
तोडायाचें ठरविलेस; परि
जोडायाचे लपवुन हेतू.

## लाभ

व्यर्थ माझी बेगुमानी
व्यर्थ माजोरी अहंता
खाक झाली, जी तुवां
अर्ध्या कटाक्षें पाहतां
मान्य ! झाली हार माझी
जिंकिलें तूं मान्य हेंही
व्यर्थ हा पुरुषार्थ, ज्याला
जिंकण्याची सोय नाही !
व्यर्थ विश्वापासुनी
धिःकारुनीया दूर गेलो
व्यर्थ सीमा ओळखीच्या
लंघुनीया पार गेलो.
वेड कोसळत्या घनांचें
आणि फुलत्या चांदण्यांचें
गे तुझ्या नादांत केलें
व्यर्थ मी अपमान त्यांचे

व्यर्थ अंतरलो तुझ्यास्तव
लाभल्या घरच्या सुखाला
बापुडा होतो कधीचा
क्रूर घावांचा भुकेला !

व्यर्थ माझी भावना अन्
आर्तता ही व्यर्थ झाली
जी तुझ्या हृदयीं न शिरतां
जागच्या जागीं जळाली !

ही (तरी) वेडी प्रतीक्षा
तिष्ठतें विसरून घाभी
घेत बेपर्वा तुझ्या
अुन्मत्त दृष्टीची कमाअी

गे अुपेक्षेच्या अुन्हानें
जीव होता पोळलेला
तूं दिलेल्या वेदनेच्या
सांवलीचा लाभ झाला. ! !

## परंधाम

माझी तनू : तुझी वेणू
तुझी मिठी : ओष्ठभेटी
पांच विषयांना पूर
आला... मस्तावले सूर
दोन्ही देह गानमय
मंद्र लागलीसे लय
तुझा गर्भवेडा काम
तेच माझे परंधाम !

## पाहुणा

कळा झाल्या कळ्या
आणि अुणावल्या वेणा
देहांतून गेहीं बाअी
आला अिवला पाहुणा.

अिवल्याशा पाहुण्याचें
सायमाखलें कौतुक
बोबड्या स्मिताने पटे
अुभ्या जन्माचें सार्थक.

जन्माचे सार्थक, तशी
धन्य कुशीची पुण्याअी
सारें अंग मांडी झालें
फुटे स्पर्शाला अंगाअी !

## पाहुणा

कळा झाल्या कळ्या
आणि अुणावल्या वेणा
देहांतून गेहीं बाअी
आला अिवला पाहुणा.

अिवल्याशा पाहुण्याचें
सायमाखलें कौतुक
बोबड्या स्मिताने पटे
अुभ्या जन्माचें सार्थक.

जन्माचे सार्थक, तशी
धन्य कुशीची पुण्याअी
सारें अंग मांडी झालें
फुटे स्पर्शाला अंगाअी !

## मुका मार

जीभ फिरवितां उभें
ओठीं चर्‌का झोंबला
गेल्या रात्रीच्या व्रणाचा
मुका मार आठवला. !

## अिन्द्रधनु

धारा ओघळतांना मध्येच
लख्ख पडावें अून्ह
तसेंच वाटलें : काजळ ओले
तुझे डोळे बघून.

भिजलेलें अून्ह पिण्या
आसावली तनू
अुगवलें सप्तरंगीं
मनीं अिन्द्रधनु.

## वेड

आज माझिया मनांस खचित वेड लागलें
साहवे न सूखही : हेच दुःख दाटलें !
मी कवि : फुलाफुलांत तरुलतांत रमणारा
धारांच्या तारांवर 'मेघ' राग गाणारा
मी कवि : निशानशेंत धुंद फुंद पडणारा
अुन्मादक चांदण्यांत अुन्मनस्क भ्रमणारा
मी कवि : मला कशास हें नसतें पागलपण ?
रंग, गंध, रस यांनी दूर जरी लोटियलें
आज माझिया मनांस खचित वेड लागलें !
आठवतें : पश्चिम नभ ओशाळुन गेलेलें
पूर्वेला मुक्तीचें अुषास्वप्न पडलेलें
आठवतो भूमिभंग : लक्ष जीव पुरणारा
आठवतो : हिंसानलिं युग पुरुष जळणारा
मी कवि : मला कशास हे नसतें पागलपण ?
त्या वेळीं हृदय कसें स्तब्ध मूक राहियलें
आज माझिया मनांस खचित वेड लागलें !

आजवरी आत्मतृप्त पुष्पकोष मिटलेलें
गंधांचें संवेदन आंत सुप्त निजलेलें
वाऱ्यानें वेलींना छळछळून सोडियलें
कलिकेच्या कैदेंतुन गंध मुक्त जाहलें
मी कवि : मला कशास हे नसतें पागलपण ?
वठलेल्या वेलींवर कोंब नवें अंकुरले
आज माझिया मनांस खचित वेड लागलें !

सोनदिवस भाग्याचा...अमृतांत न्हालेला
सप्तजन्मिचा प्रवाह बांध फुटुनि वाहियला
सह्यगिरीच्या ओठीं गीत नवें झुळझुळलें :
स्वप्न सात शतकांचें मूर्त होऊनी हसलें
मी कवि : मला कशास हें नसतें पागलपण ?
राहिलो न माझा मी, चित्त कुणा वश झालें
आज माझिया मनांस खचित वेड लागलें !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४९८८२ दि. ७/०१
क्रमांक १७०४४ नों दि. १६।२।१८

अुपकार

रेशमी कुरळ्या स्वरांच्या चांदण्याने
चिंब न्हालों, तृप्तही आकंठ झालों
केवढे अुपकार झाले हे तुझे, की
मी स्वरांचीं स्वर्गसौख्यें पावलों!
नादब्रह्माचा पिसा यात्रेकरू मी
वाहतों आतुर श्रुतींच्या कावडी या
गे तुझ्या सुरमोहिनीला मोहुनी
ब्रह्मही धांवेल आलिंगावया!
हे अुषेचें अुमलतें लावण्य तुझ्या
'तोडि'ने माझ्या मनीं आरक्त झालें
आणि ठुमरी तुझ्याने शृंगारकन्ये,
रक्तिम्याला सोनियाचें हास्य आलें!
बस्स! अिथे तूं थांब थोडी; मन्मनीं—
भावनांची वीण गे ताणूं नको
सांजचें काहूर 'सोनी' गाअुनी
आण गीतांची तुला, आणूं नको!!

## पाऊल खुणा

येणारच ओंवळ समर्थ शब्दगणांना
पाहून येथल्या तुमच्या पाउलखुणा.

( ही शंभर पानांमागिल रौद्र कहाणी
जी ऐकुन मिटते पंख भयाने वाणी )
बेफाम दौडलां कोण्या तप्त नशेंत
पेटल्या भुकेने कण कण तम भक्षीत
वीजही लाजली तेज दीप्त पाहुनिया
अन् ज्वालामुखिची काळवंडली काया

अद्याप मोडतो तर्क मेरुचा कणा
पाहून येथल्या तुमच्या पाउलखुणा !

रेणूही उठला नभ हातीं उचलून
मृत्यूला देण्या मृत्युंजय आव्हान
पिंडांत फुंकली अग्निगर्भ आरोळी
वज्रांकुर झाली त्या सरशीच लव्हाळी

प्राणही होतसे अनोळखी पाहुणा
पाहून येथल्या तुमच्या पाउलखुणा !

धिक्कार असो ह्या शब्दांचा बापुड्या
पूजनास पडती थिट्या जयांच्या अुड्या
'जय' नृत्यास्तव जर व्यास राहिला खडा
होअीन तत्पदीं नूपुर मी बोबडा

बेभान डोलविन देहाचा पाळणा
पाहून येथल्या तुमच्या पाअुलखुणा !

## अग्निगीत

रक्त बिंदूतून एका तप्त सिंधू वादळावें
स्वस्थ गात्रांचेहि आतां गोत्र खड्गाशी जुळावें
अस्थिअस्थीला दधीचिची प्रशस्तीं प्राप्त व्हावी
कार्तवीर्यालाहि शौर्याची कळा अमुच्या कळावी.
पेटल्या ओठांत स्फोटक अग्निगीतें ओघळावीं
अुग्र अीर्ष्यांच्या अरण्यांनीं मनें संकीर्ण व्हावीं
शांत या मातीमध्यें अुगवोत वज्रांचे मळे
फांदिफांदीला फुटो ज्वालाफुलांचे अन् कळे
अुकळूं दे संतप्त लाव्हा लोळत्या सरितांतुनी
झोपला ज्वालामुखी जागो अतां वाळूकणीं
वाहत्या वाऱ्यासवेंही जाळतें स्फुलिंग यावें
तीव्र विरहावांचुनीहि चांदणे अंगार व्हावें.
कैक शतकें आमुचें केलें जयें संगोपन
रक्षणासाठींच त्यांच्या धन्य हो आत्मार्पण !

## दान

कशाला करून दिलीस ओळख
तिच्याशी ? – अशी ?
म्हणालीस : माझी मैत्रीण
अति जिवलग – भारी लाडकी
अितकी की –
तिने तुम्हांला मागीतलें
तरी मी देवून टाकीन ...
—असें तरी कशाला बोललीस ?
बोलली नसतीस ... माझ्या डोक्यांतून
गाफील प्रश्न ओघळला नसता
मागणारा : ओथंबलेलें बदामी अुत्तर
तुला चिमटा घेअून कासावीस करणारें
स्वता भांबावलेलें.

आज तो लालस प्रश्न
नि तें बदामी आरक्त अुत्तर
यांची परतभेट झालीं ...अचानक

भेटीच्या ठिकाणीं ... भेटीच्या वेळीं –
तरी अचानक
खरेंच, किती नकळत
माझ्या हजारों पूर्वजन्मांनी अनावर
शपथ घातलीं—
तिलाच तें गोडंबी अुत्तर अडलें ना ?
किती अचानक गेलेला झोंक
सावरला माझ्या आतुर सावधतेने
केव्हां सावरला हें आता
लक्षांतहि नाही.

आतां लक्षांत आहे फक्त :
अेक गद्दार प्रश्न,
नि अेक अिमानदार तृप्त अुत्तर
विसावलेलें, डोळे मिटलेलें.

## डोळे

रडणाऱ्यांना डोळे फुटतात
रडण्यासाठीं
रडून रडून सुकण्यासाठीं
सुकून
मन बधिर होण्यासाठीं

रडणाऱ्यांना डोळे फुटतात
बघण्यासाठीं
हंसणाऱ्यांना
रडणाऱ्यांना हंसणाऱ्यांना
त्यांच्या निर्जल लोचनांना
आणि बधिरलेल्या मना.

रडणाऱ्यांना डोळे फुटतात
बघण्यासाठी
चोख काना-डोळी यांच्या
बहिऱ्यांना, आंधळ्यांना.

रडणाऱ्यांना डोळे फुटतात
बघण्यासाठी
रडणाऱ्यांना,
रडून रडून सुकणाऱ्यांना,
सुकून
मन बधिर झालेल्यांना.

रडणाऱ्यांना डोळे फुटतात
हें सारें बघण्यासाठी
हें सारे बघितल्यावर
रडणाऱ्यांचे डोळे फुटतात ! !

## पिच्छा

समोर आलेल्या संकटांचा
पाणउतारा करूं नकोस
त्यालाहि त्याचें प्रयोजन असेल
होऊंदे त्याच्यातरी मनाजोगें–
विचाऱ्याच्या,
घे गिळून हाहि डोस
डोळ्यांत आलेल्या आसवांना
रोखूं नकोस – रोखूं नकोस
अश्रु म्हणजे
हिरमुसलेलें बळ
पराभवाची कीड घेवून जन्मलेलें पुष्पदळ.
अश्रु म्हणजे
अपमानाचे व्रण वाहणारी
रुग्ण भावना
नको त्यांना करूं मना.
मनांत लुकलुकणाऱ्या स्वप्नांना

अुजेडांत आणूं नकोस.
तिथे तीं सुकून जातील
येतांयेतांच जिरून जातील
भ्रूणहत्या करूं नकोस.
अुजेडाच्या झळा साहून वाचल्यानंतर
( नं ) तर —
तीं अितकीं कढत होतील
तीं अितकीं कढत होतील
-- तुझा आत्मा भाजून निघेल !
विझवून टाक वेडी अिच्छा
आपदांनी आसवांचा
आणि स्वप्न शकलांचा
नको पुरवाया पिच्छा.

## दुपार

आश्विनांतली दुपार, आश्विनांतली दुपार
आभाळीं अेक शुभ्र
रिक्त निरुद्देश अभ्र
घिरट्या घालित संथ केव्हांची तीच घार
अेखादी झुळुक मंद
शेवग्यास डुलवि धुंद
अंगणांत, भिंतीवर सांवलीहि नक्षिदार
झोपाळ्यांवर निवांत
तृप्त पुरंध्री पहात--
बागडते स्वप्न शरत्पुनवेचे अंकांवर
पण संसारीं भरल्या
कां अुगाच रे स्मरल्या
त्या भेटी... त्या शपथा... वंचनाहि त्या अघोर
आश्विनांतली दुपार, आश्विनांतली दुपार !

## कुळाचार

नको नको मना
गुंतूं मायाजाळीं
करण्या अकाळीं,
पश्चात्ताप
कुणाच्या भिडेचा
नको करूं घांस
तुला उपवास
संचयीचा
कशाला सांगावें
कुणालाहि गूज ?
शोधावा सुहृद
आरशांत
मनींच जिरूं दे
प्रेमाचा पुळका
असूं दे चिळखा
आंखूडच

( येथल्या जगाची
कृपण कदर
कृपेचा पदर
नाकारितें... )
आपुल्या समोर
होआवें लाचार
हाच कुळाचार
निभवावा !

## स्वयें गोदावरी आली—

आहे नीट ध्यानांत, की
हीच गोदाअी माअुली
मागे कोण्यां गौतमाचीं
पापे प्रक्षाळून गेली !
हिच्या प्रेमभेटीसाठीं
प्रभू रामचंद्र आले
वर्षें चतुर्दश हिच्या
मायापाझरांत न्हाले.
ज्ञानदेव, एकनाथ
रामदास, जनाबाअी
हिच्या पुण्य प्रदेशांत
यांना जन्मायाची घाअी.
नाही कधींच मीं केलें
हिच्या पात्रामध्यें स्नान
नाही भक्तिभावनेने
हिचें घेतलें दर्शन !
तरी नवल ! आजला
अुरीं घेअून असोशी
स्वयें गोदावरी आली
माझ्या हट्टी पायांपाशी ! !

बदल

भुरा भुरा मोकाट माळ
अजस्त्र पहाड
ओघळते ओहळ नी
तंद्रींतलें झाड.

काळेभोर अस्ताव्यस्त
ढगाळलें नभ
खालीं कोसळतें पाणी...
असाच होता वेडावेगडा
आजी, तुझा लोभ
आणि ओथंबली वाणी.

असेंच होतें तुझें मन
जरा उघडे वाघडें
कुठें पाझरते झरे
कुठें दडावते कडे.

मांडीवरती गतीच्या
एक मुकें बाळ
पीत बदल लोचनीं
मनीं गच्च भरुन आला
रांगणारा काळ
तुझ्या ओल्या आठवणी.

## पाप

जेव्हां नेत्रांत अभ्रें सांकळतात
आणि अंतर कुंद होतें
आभाळाचा जीव कोंडतो
पानही निष्पंद होतें !

अुजेड कसा कोमेजून जातो
अंधारुन अंधारून येतें
क्षितिजाच्या म्लान ओठीं
परकें हसूं विरुन जातें

अिथून तिथून नागमोडत
अुमलून सलतें मुकी कळ
दिशा दिशा पोरक्या होतात
श्वासांचेहि गळतें बळ

कसा अव्याज विराग
जाळणारें पाप व्याला ?
मला असें छळण्याचा
कुणी तुला शाप दिला ?

REFBK-0016306
REFBK-0016306

## पहांट चित्र

चिवचिवणारी चिमणचेहऱ्याची
निरागस पहांट
आभाळ : भरून आलेल्या हृदयासारखें
प्रयासानें ओठ मिटलेलें
आळसावलेला अेखादा पायरव, अेखादा
अनोळखी आर्जवी हंबर
समोरच्या माडीवरील कोनाड्यांतल्या
कंदिलाचें श्रांत मलिन स्मित
तुटलेल्या गढीचें मुकाट भिंताड
वारा : हळुवार हातांनी दूर सारलेल्या
पांघरुणासारखा
बाकी सारें निद्राधीन, स्तब्ध, मुके,
-- जरा अशी बाहेर ये ना
जवळ जवळ अुभें राहून हें सारें पाहत राहूं
आपल्या अबोल अस्तित्वानें
पूर्ण करू
सृष्टीचें स्वप्नांकित पहांटचित्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६३०६
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
४१८८२
का०४
१०७४
२५।५।६७